मधु भोसले

# जीवन ध्यास

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१८८



REFBK-0020092
REFBK-0020092

काव्य २१८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

अनुक्रम. २००९८ वि: काव्य

ग्रं. दि. ........ बो. दि.

२१८० २३/११

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

वा. क्र. २००९८

संदर्भ. काव्य २९८७

२००९२
२३/११/७४

# जीवन न्यास

[किंमत रु. १०/-]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २००९२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२००९२
शाखा (स्थळ प्रत)

# जीवन न्यास

REFBK-0020092
REFBK-0020092

मधु भोसके

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© श्रीमती हौसाबाई गोविंदराव भोसले
२५४६ ए वॉर्ड, खरी गल्ली, कोल्हापूर

म – ४०१
पहिली आवृत्ती : १९७४ / १८९५

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिवपार्वती
४६१/४ टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००९२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

'जीवन-व्यास' ही कै. मधु भोसले यांची निर्व्याज-मनोहर कृती आहे आणि ती त्यांच्या अकाल मृत्यूच्या काळ्या पार्श्वभूमीवरच प्रगट व्हावी ही एक नियतीची विचित्र करणी आहे. महाभारत म्हणजेच नियतीच्या सूत्राची विस्मित करणारी जाणीव आहे, आणि त्या नियतीच्या सूत्राची पुरेपूर जाणीव मधु भोसले यांना होती हे या कृतीत सतत दिसून येते. परंतु हा लेखक मृत्यूच्या बंधनात इतका लवकर अडकला जाईल याची कल्पना वाचकाला मात्र सहज पचवता येण्यासारखी नाही. सारखे वाटत राहते की 'जीवन-व्यास' सारखी अतिशय हृद्य आणि विचारगर्भ निर्मिती आणखी निरनिराळ्या आविष्कारांत विपुल सूक्ष्म आणि भव्य रूपे घेऊन यापुढे सतत आमच्यात राहायला हवी होती. 'जीवन-व्यास' ही त्या भावी कृतींची नांदी असायला हवी होती, पण जीवनाची नांदी म्हणून सूत्रधार स्वतः कायमचा अंतर्धान झाला आहे आणि पुढचे नाटक अनुच्चारित राहून गेले आहे असे सतत वाटत राहते.

या 'जीवन-व्यासा'त अठरा कविता आहेत आणि त्यात महाभारतातल्या विविध व्यक्तींशी कवीने संवाद केला आहे. पहिला संवाद भगवान व्यासांबरोबर आहे. व्यासावर इतके निर्मळ आणि इतके उत्कट उद्गार कुणीच काढले नाहीत. व्यासाला भगवान का म्हणतात त्याचे कारण कवीने स्वतःशीच शोधले आहे. कारण महाभारत हा ग्रंथ ईश्वराने रचिलेल्या सृष्टीइतकाच गूढ आणि विस्मयकारक त्याला वाटतो. एवढेच नव्हे तर स्वतःच्याच पुत्रपौत्रादिकांचा इतिहास लिहिताना निर्मम आणि केवळ साक्षीभूत असलेला हा व्यास खरोखरच ईश्वरासारखा अंतर्ज्ञानी आणि द्रष्टा आहे अशी कवीची समजूत आहे. महाभारत म्हणजे एक काळचक्र आहे, त्याचा कणा श्रीकृष्ण आहे, गती कृष्णा म्हणजे द्रौपदी आहे आणि व्यास हा त्या चक्राचा आस आहे, पांडव हे आरे आहेत अशी कवीची धारणा आहे. काळचक्र म्हणजे प्रत्यक्ष जीवनच आहे,

आणि भगवान व्यास हा जीवन-व्यासदेखील आहे म्हणजे स्वतःच्या आसातून निघालेल्या स्थितिगतीच्या आकृतीचा व्यास आहे. सर्व मर्यादा तो जाणतो आणि त्याला असीम असे काहीच नाही. मानवाच्या पलीकडे मानव कसा जाऊ शकतो याचे उदाहरण इतिहासकार व्यास हाच आहे.

पांडवांच्याबद्दल कवी म्हणतो की पांडव म्हणजे पंचप्राण आणि हे पंच-प्राण कार्यान्वित करणारे शरीर म्हणजे द्रौपदी आणि सारथी श्रीकृष्ण हा या पंचप्राणांचा सूत्रधार आहे. हा श्रीकृष्ण उभा असतो, तो हातात शस्त्र धरीत नाही, पण सर्व काही याच्या प्रेरणेने चालते, सर्व सूत्रे अखेर याच्याच हाती असतात.

मधु भोसले यांनी ' धर्म ' ही एक अमूर्त व्यक्ती आहे असे समजून तिच्यावर कविता रचली आहे. सामान्यपणे धर्म आणि युधिष्ठिर हे एकरूप आहेत असे आपण धरून चालतो, परंतु भोसले यांनी धर्म आणि युधिष्ठिर यांना अलग केले आहे आणि अमूर्त धर्माला उद्देशून ते म्हणतात की, तू एक अखंड अंतःसूत्र आहेस, एक अगोचर असे अस्तित्व आहेस. महाभारत ही वस्तूच अशी अवर्णनीय आहे की, तिच्यातल्या कुठल्याही गोष्टीचा किंवा व्यक्तीचा खरा धर्म, पूर्ण मर्म, कार्यकारणभाव आणि प्रयोजन यांची सुसंगती सिद्ध करायची तर कुणालाही महाभारताच्या अंतरंगात धर्माच्या अनुषंगानेच प्रविष्ट व्हावे लागते आणि नंतर अखेरपर्यंत बाकी सर्व नष्ट झाले तरी एकच भान माणसात शिल्लक राहते ते म्हणजे धर्माचे आणि धर्माच्या अधिराज्याचे. भोसले म्हणतात की धर्मच महाभारताचा नायक आहे ही जाणीव आपल्या मनात शेवटी कायम राहते.

भीष्माला तर कुरुकुलाचा कल्पवृक्ष म्हणतात, परंतु त्याने पित्यासाठी स्वतःचा वंशच्छेद करण्याचे व्रत घेतल्यावर त्याच्यातून केवळ वांझ वृत्तीच प्रगट होत राहिली. त्याला धर्म, नीती, ज्ञान, विद्या, शक्ती, युक्ती आणि मुक्ती या सर्व गोष्टी कुरुवंशातल्या वीरांना द्यायच्या होत्या, पण त्याच्याजवळ कुणी काही मागितलेच नाही आणि तो कुणाला काही देऊच शकला नाही. इच्छामरणी होऊनदेखील हा गंगापुत्र कुलनाशक आणि कराल अशा कुरुक्षेत्रावर शरशय्येवर मरणाचा मुहूर्त पाहात तडफडत पडला होता.

धृतराष्ट्राला कवी अंधात्मा म्हणतो आणि या स्वार्थांध राजाबद्दल तो असे म्हणतो की, आत्म्याच्या अंधत्वाला कसलाही पर्याय नसतो. पर्याय असतो तो फक्त सर्वनाशाचा.

गांधारीबद्दल भगिनी निवेदिता यांनी ती सर्वश्रेष्ठ आदर्श पतिव्रता आहे असे उद्‌गार काढलेले आहेत. गांधारीसारखे कौतुक त्यांनी दुसऱ्या कुठल्याही पौराणिक स्त्रीचे केलेले नाही. अंध पतीच्या अंधत्वात सहभागी होणारी ही स्त्री हाच त्यांच्या कौतुकाचा विषय. परंतु मधु भोसले यांना गांधारीने आपली दृष्टी पट्टी बांधून बंद केली याचा विषाद वाटतो आणि गांधारीचा रागही येतो. तिने दृष्टी मुक्त ठेवली असती तर तिला आपल्या अंध पतीच्या डोळ्यांतली वेदना दिसली असती आणि त्याचा कामतृप्त सुखी चेहराही दिसला असता. तिने कामसुख उपभोगले, प्रसूती-वेदनाही भोगल्या परंतु स्वतःच्या उदरातून निघालेला नवजीवनाचा लसलसता अंकुरही तिने पाहिला नाही. मुलांना तिने डोळे भरून पाहिले असते तर बालकाच्या निरागस जीवनातला आनंद तिला खूप काही देऊ शकला असता.

कुंतीच्या कुंवारपणातल्या मातृत्वाचा उल्लेख करून मधु भोसले जणू काही एका अप्रिय गोष्टीवर नेहमी इतर लोक करतात ते भाष्य करण्याचे टाळून सहज पुढे निघून गेले आहेत. कारण कुंती ही त्यांना पृथ्वीसारखी प्रसवशील माता दिसते आहे. त्यांना तिने पुत्राला टाकले या विदारक सत्याची चिरफाड करायची नाही. त्यांना फक्त कुंतीत एकच गोष्ट दिसते की, कुंती कुठल्यातरी अज्ञेय वांच्छिताच्या मागे धावते आहे, पण तिची धाव धपापलेली नाही तर ती स्थिरचित्त झालेल्या एका योगिनीची अतिशय सूक्ष्म अशी भ्रमणगती आहे. कारण कुंती केव्हाही वैतागत नाही, सुखाने बेहोष होत नाही, कधी अल्लडपणे वागत नाही, कधी जराजर्जर झालेली दिसत नाही. तारुण्यातही ती कधीही कामविव्हल झालेली दिसत नाही. ती सदा जागृत असते, संयत असते, तिचे स्मित जाणवते, पण हास्य दिसत नाही. तिच्या पापण्यांवर अश्रूंचे कण दिसतात, पण अश्रू गालावर कधी ओघळत नाहीत. तिने दुःखाचे वरदान मागितले परंतु हे दुःख अंतिम सुखाचेच दुसरे रूप आहे असे कवीला वाटते. त्यात स्थितप्रज्ञाची सुखदुःखे, लाभालाभ आणि जयाजय समान करणारी चिरशांती आहे, आणि म्हणूनच वनाग्नीत तिने समिधेसारखी आपल्या देहाची आहुती दिली आणि म्हणूनच कुंतीचे दुःख हे योग्यांना सांसारिक सुखाचे जे वैय्यर्थ्य भासते तेच आहे. त्याचेच नाव म्हणजे सुख.

युधिष्ठिराबद्दल कवी म्हणतो की अनेक अधर्म्य गोष्टी या युधिष्ठिराने

केल्या पण अधर्माला त्याने कधीही धर्म मानले नाही आणि अधर्माचे प्रायश्चित्त घ्यायला तो कचरला नाही हेच त्याचे मोठेपण.

दुर्योधनाबद्दल ते म्हणतात की कुरुक्षेत्रावर मरणाला महापूर आला असताना दुर्योधन त्याच्याकडे निःशंक पाहात होता. हा मरणपूर रजस्वला द्रौपदीच्या विटाळ रक्ताचा होता आणि त्या पुरात भीष्म, कर्ण, द्रोण, शकुनी वगैरे सारे वाहून गेले. त्याने द्यूत खेळायला नको होते, त्याने पांडवांचे वैर करायला नको होते. हाच भीषण अविचार आणि भयानक बंधुद्वेष हेच दुर्योधनाच्या जीवनाचे सार. तो क्षात्रधर्माला जागला नाही. काहीही मिळविणे, कसेही मिळविणे, मिळवले म्हणजे झाले हा धर्मविचार नव्हे, ही अविवेकी पशुता आहे असे कवी म्हणतो.

कर्णाबद्दल तो सूर्यपुत्र होता पण दुसरा सूर्य नव्हता, कारण तो पृथ्वीपुत्र म्हणजे कुंतीपुत्र होता, सूर्य दोन असूच शकत नाहीत, असे कवी म्हणतो. कर्णाच्या वाचाळपणामुळे त्याचा पराक्रम वाया गेला आणि त्याने जे दान केले ते डांगोरा पिटून केले आणि अपात्री केले त्यामुळे त्याच्या दानालाही काही फळ आले नाही.

शकुनीला ते अपशकुनी म्हणतात. दुष्टांनाही तपःसामर्थ्य असते, एक शक्ती असते. उदा० वटवाघूळ स्वतःला उलटे टांगून घेऊन स्वतःची विष्ठा खाण्याचे व्रत घेते आणि त्याला अंधारातही दिसते. शकुनीमुळे स्मशानातली हाडके सर्वत्र पसरली आणि हस्तिनापूरचे अस्थिनापूर झाले.

द्रोणाबद्दल कवी म्हणतो की दारिद्र्याच्या दुःखाने कावून जाऊन द्रोण आपल्या मित्राकडे – द्रुपदाकडे, निर्लज्जपणे याचना करायला गेला हा त्याचा दोष आहे. वास्तविक लक्ष्मीपुत्रांनी सरस्वतीपुत्राकडे नम्रपणे जावे ही योग्य रीत द्रोणाने मोडली आणि त्याचे प्रायश्चित्त त्याला आणि सर्वांनाच मिळाले. तो मेला पण भिक्षांदेही मात्र चिरंजीव होऊन अजून जगात लाचारीने भटकतेच आहे.

अश्वत्थाम्याबद्दल ते म्हणतात की, जी जी गोष्ट अश्वत्थाम्याला स्पर्श करते ती ती गोष्ट त्याच्यासारखीच चिरंजीव होते. उदा. तृष्णा, असूया, सूड, वेदना आणि जखमा या गोष्टी आता या अवनितलावरून कधीच नष्ट होणार नाहीत.

विदुराबद्दल ते म्हणतात की, विदुर म्हणजे सत्ता नसलेल्या शहाणपणाची शोकांतिका. जे होऊ नये म्हणून विदुरासारखे महात्मे आयुष्यभर

टाहो फोडून सतत सांगत असतात तेवढेच नेमके या जगात सतत होत राहते.

द्रौपदीवरून कवी असे म्हणतो की द्रौपदी म्हणजे स्त्री आहे. ही स्त्री प्राकृतिक आहे, शिवशक्ती आहे, आणि प्रत्यक्ष धरित्री आहे. ती जीवनदात्री आहे, परम सोशिक आहे. बीजाचा महावृक्ष करते म्हणून तिला जगदंबा म्हणतात. परंतु जर या जगदंबेचा कोप झाला तर सर्वत्र विनाश ओढवतो. द्रौपदी याज्ञसेनी होती आणि ही याज्ञसेनी अग्नीच्या विविध स्वरूपांतून जळत राहिली. ती सतत क्रोधाने जळत राहिली आणि अखेर या याज्ञसेनीच्या क्रोधामुळेच कुरुक्षेत्रावरील रणयज्ञात सहस्रपाद, सहस्रशिर, सहस्राक्ष असा महाकाय आणि मदोन्मत्त असा पुरुषी अहंकार पूर्ण जळून गेला.

एकलव्याबद्दल कवी असे म्हणतो की, द्रोणाने एकलव्याशी त्याचा अंगठा कापून घेण्याचे जे घाणेरडे वर्तन केले त्यात त्याला व इतरांना आपण एकलव्याच्या उदंड श्रद्धेपुढे हतबल झालो आहोत ही जाणीवच दिसून येते. एकलव्य फक्त प्रेम जाणत होता, श्रद्धा जाणत होता, कपट जाणत नव्हता. वास्तविक श्रद्धा ही दुरितांना प्रकाश देणारी आणि दलितांना शक्ती देणारी हवी, परंतु एकलव्याची श्रद्धा ही अंधश्रद्धा असल्यामुळे तिच्यातून दुःखच निघाले.

श्रीकृष्णाबद्दल कवी म्हणतो, तू देव आहेस की माणूस आहेस हे मला समजत नाही. सर्व देवांचे देवपण पारड्यात घातले तरी तुझे पारडे जड होते, आणि सर्व देवांचे देवपण आणि माणसांचे माणूसपण एकत्र केले तरीही तुझे पारडे जडच राहते. श्रीकृष्णाची तुलना फक्त श्रीकृष्णाशीच होऊ शकते. मग श्रीकृष्ण कोण आहे ? तर तो म्हणजे मानवांना महामानव मापण्याचे मिळालेले एक परिमाण आहे आणि सर्व संगीताचा षड्ज आहे.

असा हा जीवन-व्यासाचा प्रपंच आहे. हे काव्य वाचताना कुणीही रंगून जाईल आणि क्षणभर तरी थांबून विचार करील यात संशय नाही.

— दुर्गा भागवत

# अनुक्रम


१ कृष्णद्वैपायन श्री व्यास १
२ हे पाण्डव ७
३ धर्म ८
४ पितामह भीष्म १२
५ धृतराष्ट्र १७
६ गांधारी १९
७ कुंती २३
८ युधिष्ठिर ३३
९ दुर्योधन ३८
१० द्वितीय पाण्डव भीम ४७
११ अधिरथ सूतपुत्र कर्ण ५६
१२ शकुनी ६४
१३ द्रोणाचार्य ७०
१४ अश्वत्थामा ८०
१५ विदुर ८४
१६ द्रौपदी ९०
१७ एकलव्य १००
१८ भगवान श्रीकृष्ण ११९

# कृष्णद्वैपायन श्री व्यास ॥ १ ॥

' एकोऽहं बहुस्याम् '
— जो एक होता
तोच अनेक झाला
आणि
अनेकत्व पावलेला तो
पूर्ण स्थिरचित्त
निर्गुण–निराकार
आपल्याच
अनेकविध सगुणत्वाकडे
निर्मम पाहणारा
ईश्वर

हे व्यास—
महाभारताचा आदिपुरुष तू
तुझ्यापासून सर्व निपजले
तू सर्व सर्व पाहिलेस

तूच सर्व लिहिलेस
तू लिहिलास
हा ‘ जय नावाचा इतिहास ’
रचिलेस हे महाकाव्य
प्रतिपादलास हा महान ग्रंथ

आपल्याच रक्तबीजातून
निर्माण झालेल्या पुत्रपौत्रांचा
लिहिलास तू
हा इतिहास
अत्यंत तटस्थपणे
आपल्याच अनेकत्वाकडे
निर्विकार
निर्मम वृत्तीने
पाहणाऱ्या चित्स्वरूप परमेश्वराप्रमाणे
म्हणूनच तू
भगवान
—भगवान श्री व्यास

या इतिहास लेखानाच्या निमित्ताने
गहनगूढ, अथांग अशा ह्या
मानवी जीवन-समुद्राच्या तळापर्यंत
घुसलास तू
घुसलास तू मेरु-मन्दाराप्रमाणे

आणि घुसळून काढलास
तो सारा तळ
आणि आणल्यास खेचून बाहेर
असंख्यात रत्नराशी.

इथे असीम पौरुषाचे
दीप्तिमान कौस्तुभ आहेत.

तर फुलणारी
आणि फुलताच निखळून पडणारी
क्षणजीवी
पण तरीही
आपल्या स्निग्ध गंधाने
रसिक मनात कायम दरवळत राहणारी
पारिजातकाची फुलेही आहेत.

इथे लक्ष्मीचे चांचल्य आहे
ऐश्वर्य आहे ऐरावताचे.

धन्वंतरीची संजीवकता आहे इथे,
इथेच आहे अमृताचे चिरयौवन.

क्षणात धुंद करणारी,
मदोन्मत्त करणारी सुराही आहे.

आणि सतत जाळत जाणारा

हलाहलाचा विखारही आहे.

हे दिव्यदृष्टी व्यास !
ह्या मानवी जीवनाची अनन्य उत्तुंगता
आणि अथांग खोली
तू एकाच वेळी निरखून टाकलीस.

मानवाच्या जीवनमर्यादेचा
उभा – आडवा परीघ
त्याच्या विविध रूपी भाव – स्वभावांचे
स्वाभाविक अक्षांश – रेखांश
तूच रेखांकित करून टाकलेस.

मानवाच्या
आत्मिक, शारीरिक, मानसिक क्षितिजांच्या
साऱ्या चतु:सीमा आकळून टाकल्यास.

आहार, निद्रा, भय, मैथुन —
अर्थ, काम, मोक्ष —
त्याच्या साऱ्या साऱ्या गरजा
त्याचे धर्म – अधर्म
कर्म – अकर्म
नीती – अनीती
ज्ञान – अज्ञान – विज्ञान

— या साऱ्यांच्या कक्षा
तू निश्चितपणे जाणल्यास.

हे त्रिकालज्ञ व्यास—
या इतिहासकालाचे
पूर्ण दर्शन घडवलंस तू;
युद्धपूर्व काल
संपूर्ण युद्ध काल
युद्धोत्तर काल
यांचे सम्यक् दर्शन
झाले तुला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २०००२ दि: ...
२१८८ २३।११
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०००२
संदर्भ शाखा (स्थल प्रत)

ह्या काळचक्राचा कणा होता
भगवान श्रीकृष्ण
ह्या काळचक्राची महान गती होती
कृष्णा
आणि
हे कृष्णद्वैपायना—
तू होतास
आस ह्या काळचक्राचा

कृष्ण — कृष्णा — कृष्णद्वैपायन
ह्या काळचक्राचे आरे होते
पांडव
— जणू पंच महाभूते.

कणा — गती — आस.
यांना भिडून गेलेली

ही शक्ती
हे ह्या कालाचे
अष्टावधान
हेच ते
कालचक्र दर्शन
हेच ते सुदर्शन

हे बादरायणा —
तू आधी होतास
मधेही होतास
आणि
अंतीही तूच उरलास-
त्या चित्तत्त्वाप्रमाणे.

हे भगवान व्यास—
तू जीवन व्यास
—तुला वंदन असो
तुला शतशः प्रणाम असोत.

# हे पाण्डव ॥२॥

हे पाण्डव—
हे पाण्डव जणू पंचप्राण
आणि
हे पंचप्राण
लीलया स्वतःत सामावून घेऊन
त्यांची सारी शक्ती
कार्यान्वित करणारे शरीर
म्हणजे द्रौपदी

आणि या शरीरासकट
साऱ्या पंचप्राणांची सूत्रे
आपल्या हाती घेऊन
उभा असलेला सूत्रधार आत्मा
म्हणजे सारथी श्रीकृष्ण.

## धर्म ॥ ३ ॥

एकत्र गुंफून पूर्ण केलेला
एक मोत्यांचा सर
वरवर पाहता वाटते—
मोतीच मोत्यांना चिकटले आहेत
अभावितपणे
आणि निर्माण झाली आहे
ही माला
पण जरा ताणून
एकमेकांपासून विलग केले हे मोती
म्हणजे कळून येते
त्या सर्वच मोत्यांच्या
अंतरंगातून आरपार ओवून गेलेले
त्या सर्वच मोत्यांना एकत्र बांधून ठेवणारे
अति सूक्ष्म सूत्र

महाभारतातील धर्म—

एक अखंड, अतूट अंत:सूत्र
वरवर न दिसणारे
न जाणवणारे
दिपवीत तर नाहीच
उठूनही दिसत नाही
अगोचर असे एक अस्तित्व.

या सृष्टीत निपजणाऱ्या
कोणत्याही वस्तुजाताला
अगर व्यक्तीला
बाह्य
रंग रूप आकाराबरोबरच
लाभलेला असतो
एक आंतरिकही
आकार रंग रूप
आणि
त्या त्या वस्तुजाताचे
वा
व्यक्तीचे
संपूर्ण आकलन करून घ्यायचे,
त्या वस्तूचा
वा
व्यक्तीचा
खरा धर्म

पूर्ण मर्म
कार्यकारण भाव
आणि प्रयोजन
यांची संपूर्ण सुसंगती
सिद्ध करायची
तर
प्रविष्ट व्हावेच लागते
त्याच्या अंतरात
आणि
महाभारताच्या अंतरंगात प्रविष्ट झाल्यावर
आदि-पर्वापासून स्वर्गारोहण-पर्वापर्यंत
प्रत्येक पर्वात
पर्वा-पर्वातील प्रत्येक घटनेत
आणि घटने-घटनेतील प्रत्येक घटकात
मग एक धर्म
—धर्म
आणि धर्मच दिसत राहतो
आणि अबाधित होते
धर्माचे नायकत्व.

धर्म काहीच घडवीत नसतो
पण धर्माविना काहीच घडत नसते
धर्म........धर्म........
—यात आहे शरीरधर्म

मनोधर्म........ब्राह्मधर्म....
क्षात्रधर्म....
जित–जेत्यांचा धर्म
राजधर्म – लोकधर्म
समाजधर्म – सेवाधर्म

लौकिकापासून पारलौकिकापर्यंत
भौतिकापासून आध्यात्मिकापर्यंत
सर्वगामी अशी ही एक
महान धर्मचर्चा

यातून वजा केला धर्म
तर अंतःसूत्र हरवून बसलेली
ही घटना–प्रसंगांची एक
विस्कळीत मोत्यांची रास
रूपहीन—आकारहीन.

## पितामह भीष्म ॥४॥

कल्पवृक्ष तू
फळे तुझी अमृताची
उभा होतास तू
कुरुकुलराजलक्ष्मीच्या द्वारी.

आपल्या शाखा–विस्ताराची
अखंड – शांत सावली
कुरुकुलोत्पन्न पुत्र–पौत्रांना
लाभावी म्हणून
पर्णभाराने भरगच्च होऊन
फांदी–फांदीवर
—उभा होतास.

कुलकीर्तिगंधाने
जावा दरवळून
आसमंत सारा
म्हणून गेला होतास मोहरून

डहाळी – डहाळीवर.

अमर कीर्तिपद देणाऱ्या
अमृत – फळांच्या भाराने
गेला होतास वाकून.

तू कल्पवृक्ष
तू भुवन–वांच्छातृप्तीचे
धर्म, नीती, ज्ञान,
विद्या, शक्ती, युक्ती–––
हाती घेऊन उभा होतास
देण्यासाठी
पण........
पण तुझ्याकडे कुणी
काही मागितलेच नाही.

तुझ्या सावलीचा केला
साऱ्यांनीच अव्हेर
ईर्षेने, असूयेने फुत्कारणाऱ्या
श्वासांना
तुझ्यावर फुललेल्या
पुष्पांचा गंध
कधी जाणवलाच नाही.

अधम असूयेची सुरा पिऊन

धुंद आणि मतिमंद झालेल्या
कुरुकुल पुत्र-पौत्रांनी
तुझ्या अमृत-फळांची
कधी इच्छाच केली नाही.

ती सारी फळं
पिकली, पिकली
पिकून तुटून पडली धुळीत
अखेर
सडून–मिसळून गेली मातीत

मातीचा तर गुण असा—
ओटी-पोटी घेतलेले बीज
जिवंत करते ती
पण........पण........
पित्यासाठी घेतलेल्या प्रतिज्ञेने
तू निर्बीज करून टाकली होतीस
आपली फळे.

आणि
आपणहून तू स्वीकारलेले
हे वांझपण
तुझ्या
प्रत्येक सुज्ञ प्रयत्नाला
आणि

पराक्रमालाही रिचवून बसले.

कुलविस्तारासाठी तू आणल्यास
हरण करून
राजकन्या
पण त्याही राहिल्या वांझच
पुढे स्वीकारावा लागला त्यांना
संततीसाठी
नियोग
आणि जगात बोलवा झाली ती
—तुझ्या षंढत्वाची.
परशुरामालाही शरण न जाणारा
प्रत्यक्ष श्रीकृष्णालाही
प्रतिज्ञा भंग करायला
भाग पाडू शकणारा
पराक्रम तुझा
जिंकू मात्र शकला नाही
—काहीच
कुणालाच.

कुलकीर्तीसाठी
तू सांगितलेला
कोणताही सुविचार
कोणतीही सुज्ञ कृती

प्रसवू शकली फक्त
—रिते वांझपण !

हे देवव्रता
तू होतास कल्पवृक्ष
पण कुरुकुल पुत्र-पौत्रांनी
अव्हेरली तुझी छाया
तुझी फुले, फळे....

आणि मग अखेर
याच अवहेलनेच्या
सहस्र बाणशिरांवर
तडफडत राहिलास तू
इच्छा-मरणी तू
शेवटी
मरणासाठी मुहूर्त पाहात
उत्तरायणाचा
पडला होतास तू
सारेच गंगार्पण करून

हे गांगेया
पडला होतास तू
शर-शय्येवर
कुलनाशक, कराल कुरुक्षेत्रावर.

# धृतराष्ट्र

॥ ५ ॥

हे होते एक पूर्ण अंधत्व.
नव्हते नुसत्या शरीराचे
हे अंधत्व होते आत्म्याचेही

स्वार्थ जेव्हा प्रविष्ट होतो अंतरात
तेव्हा
तो फोडून टाकतो
प्रथमतः आत्म्याचे दिव्यचक्षू
आणि मग
तारकारहित आकाशाची पोकळी
भरून जावी भयाण अंधकाराने
—तसे होते मग जीवन
—मार्गहीन, दिशाहीन,
प्रकाशाचा अव्हेर करून
स्वतःच स्वतःभोवती फिरफिरून
गरगरणारे

स्वार्थांधता करते निःसत्त्व
मानवातील मानव्याला
न्याय, नीती, धर्म, विवेक
चारित्र्य, शुचिता यांचा
क्षय करून

हे अंधराज—
बाह्य अंधत्वाला
मार्गदर्शक डोळस हातांचा
आधार घेऊन
तुझे शरीर
सर्व संकटांपासून
वाचवलेस तू
आयुष्यभर;
पण विनाशाच्या गर्तेकडे
वाटचाल करीत असलेला
तुझा अंधात्मा....

शरीराच्या अंधत्वाला
घेता येतो आधार
कुणाचा तरी; कशाचा तरी
पण आत्म्याच्या अंधत्वावर
कसलाही नसतो पर्याय
विनाशावाचून
सर्वनाशावाचून.

## गांधारी ॥ ६ ॥

हे गांधारी —
तू केलास पतीचा स्वीकार
पण त्याला कधी
डोळे भरून पाहिलेच नाहीस
तू पाहिले असतेस
एकदा डोळे सोडून
तर दिसली असती
आंधळ्याच्याही डोळ्यांतली आर्तता तुला
आणि पटली असती
या जगाची वैय्यर्थता
तू अनुभवलेस मैथुनातले सुख
आणि....प्रसव-वेदना सुद्धा
पण पाहिले नाहीस
भोगतृप्त मुखावरील
समाधानाचे विलसित
आणि पाहिला नाहीस

स्वतःचा, उदर-विदारणाने
मातृत्व सुफलित करणारा
नवजीवनाचा लवथवता उगवता कोंभ

गांधारी—
तू पाहिले असतेस
एकदा डोळे सोडून
आपल्या नवजात बालकांना
तर कळला असता तुला
निरागस, निरपेक्ष आनंद
या जगातला

गांधारी—
तू आपल्या शतपुत्रांना
स्तनपान दिलेस
पण स्तनपानाने तृप्त झालेल्या
आपल्या एकाही पुत्राच्या
कमल-पाकळ्यांसारख्या
लालचुटूक ओठांवर
दवबिंदूसारख्या चमकून विलसणाऱ्या
आपल्याच दुधाचे तेज.

—पाहिले नाहीस कधी

आणि पाहिले असतेस तू

तर न्हाऊन निघाले असते
तुझे शतपुत्रही
मातृनयनातून वर्षणाऱ्या
अमृतमय स्निग्ध चांदण्यात

गांधारी—
तू उघडे ठेवले असतेस आपले नेत्र
तर दिसले असते तुला—
वाऱ्यातले सळसळते चैतन्य
दिसले असते तुला—
गंधित फुलांचे उमलते सौंदर्य.
तू फक्त शरीराने भोगलेस
आणि
कानाने ऐकलेस;
तू ऐकलेस धनुष्यांचे टणत्कार
पण पाहिला नाहीस कधी
प्रत्यंचा ताणून
पवित्र्यात उभ्या असलेल्या
आपल्या शूर पुत्रांचा दिमाख
तू ऐकलेस वेदनेचे रुदन
पण अश्रू कधी पाहिलेच नाहीस
आणि म्हणूनच
हे गांधारी—
तू शतपुत्रा झालीस

शतवीर जननी झालीस
पण तुझ्या मातृत्वाची गौरवगाथा
कधी गाइलीच गेली नाही
आणि हाय
गांधारी–
अखेर तू आपल्या शतपुत्रांचा
मृत्यूसुद्धा नुसता श्रवणच केलास
आणि इतरांनी ऐकला
तोही तुझा कोरडा विलाप

अश्रू........
अश्रू दिसलेच नाहीत कुणाला
डोळ्यांवर बांधलेल्या सात–पदरी पट्टीने
रिचवून टाकलेस तुझे अश्रू
सप्तपाताळाखाली.

## कुंती ॥७॥

मातृत्व सुफलित करण्यासाठी
कुमारिकेला मिळाले वर
आणि येत होता बहर
तेव्हाच
मुसमुसत्या यौवनाला;
मातृभाव व्हायचाच होता जागृत
अजून जिच्या अंतरात
अशा नवजात कौमार्याला
झाली अनिवार इच्छा
रतिसुखाची

आणि भर प्रकाशात झाली नग्न
उन्मत्तपणे.
प्रकाशाला आवाहन करून
अन् अस्पर्शित योनी
झाली मग संभोग-तृप्त

पण—

पण तिला हे माहीत नव्हते—
सूर्य जेव्हा करतो प्रकाशदान
भूमीवरील सर्वच वस्तुजाताला
तेव्हा
प्रत्येक वस्तूला प्रदान करतो
एक छायाही—
अचेतन, सरपटणारी धुळीत
काळीकुट्ट
जिला नसते अस्तित्व स्वयंभू

प्रकाशाकडून स्वीकारता येत नाही
नुसताच प्रकाश
छायाही स्वीकारावीच लागते
अपरिहार्यपणे

—हा एवढाच एक कलंक
आततायी अविचार
तारुण्यातील अनावर ऊर्मींनी
तुझ्या हातून घडवलेली ही
एकच एक
कधीही सुधारता न आलेली—
चूक
पण

यदुनन्दिनी —
तारुण्याच्या उंबरठ्यावर लागलेली
ही एकच एक ठेच
साऱ्या आयुष्यभराचे सावधपण
देऊन गेली तुला
मग
सुख-दु:खांचे अनंत कल्लोळ
माजले भोवती
तरी तू कधी
विचलित झाली नाहीस
कधी
प्रक्षुब्ध झाली नाहीस

कासवीच्या सावधानतेने
वावरलीस संसारात
परगृही दान केलेली
कोवळेपणीच
मातृ-पितृ प्रेमाला वंचित झालेली
राजकन्या तू
हस्तिनापूरची राजलक्ष्मी
सम्राज्ञी म्हणून ढळू लागली
तुझ्यावर
सुवर्णचामरे
तरी तू

गर्वाने कधी फुलून गेली नाहीस
पतिनिधनानंतर
पाच पोरे पदरी घेऊन
वैधव्याचे कठिणतर दिवस
भोगलेस
मनाचा दगड करून

दिराने राज्य लुबाडले
उघडी पडली तुझी मुले
तरी
क्षुब्ध-चित्त झाली नाहीस
तू.
पुढे
इंद्रप्रस्थ लाभले
श्रीकृष्ण कृपेने,
ते विस्तारले;
राजमाता म्हणून वावरताना
आनंदाच्या ऊर्मींनी
शुद्ध कधीच हरपली नाही तुझी.
धर्मराज द्यूत खेळला
आणि
सारे, सारे काही
हरवून बसला
वैभव गेले

राज्य हरपले
राज्यलक्ष्मीबरोबर जिंकली गेली
गृहलक्ष्मी
अपमान, हेटाळणी, अनादर........
ज्या हातांच्या कर्तृत्वाने
कुलकीर्तिमंदिरावर
सुवर्णकलश चढावयाचा
त्याच हातांनी
झळाळत्या कुलकीर्तीला
फासला गेला
काळिमा
तरीही
शांत चित्त राहिलीस तू

पती निघून गेला होता
पुत्र राज्य हरवून बसले होते
आणि
निघाले होते वनवासासाठी
तरी
अशा निराधार स्थितीत
विदुरगृही
अस्तित्वशून्य रहिवास केलास.
अज्ञातवासाचे दिवस संपवून
पांडव परत आले

झाली श्रीकृष्ण शिष्टाई
झाली, तशी ती वाया गेली

भारतीय युद्ध पेटले
—पेटले आणि विझून गेले
पांडवांचे साम्राज्य सुरू झाले
पण
राजवैभवात लोळण्याऐवजी
तू
पत्करायचा ठरवलास—
वनवास
तुझ्या पुत्रांनी केला आकांत
सुनांनी धरणे धरले
पण
निर्धाराने
निघून गेलीस तू
आणि शेवटी
सरसावून येणारा
वनवणवा पाहून
तू केलास
देहही समर्पित
आयुष्यभर जपलेल्या निर्धाराने,
शांत चित्ताने.
तुझ्या डोळ्यांत

केव्हा तरळले पाणी
—पण
पापणीचा बांध फोडून
कधी वाहिला नाही
अश्रूंचा महापूर.

स्मितरेषा उठल्या
पण
मुक्त हास्य
कधी खळखळले नाही
तू धुमसलीस
पण
कधी पेटून उठली नाहीस
तू आग्रही होतीस
पण
हट्टी दुराग्रह कधी धरला नाहीस.
कुंती
तू मागितले होतेस एकदा
परमेश्वराजवळ
दुःख....
सुख निःशेष असे
जीवनभराचे दुःख
जे भेटते या जगात
पावलोपावली

जगाला या
दु:खमूळ म्हटले आहे
संतांनी
जन्म-मरणाला उपाधी म्हटले आहे
महात्म्यांनी
तरीही
मागितलेस तू
दु:ख
कारण
तुला माहीत होते—
सुख सुख म्हणजे
अखेर काय आहे ते

अनित्य म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या
या जगात
असते
सुख-दु:खही
अनित्यच

सुख........दु:ख
तो एक असतो
ऊन-सावलीचा खेळ
किती सापेक्ष
जे असते आपले सुख

ते असते दुसऱ्याचे दुःख

तू मागितलेस दुःख
ईश्वर-स्मरणासाठी;
नाही कुंती—
तू मागितलीस
प्रक्षोभमुक्त स्थिर चित्तशांती

जगावर
अनियंत्रित अधिसत्ता गाजवणाऱ्या
नियतीच्या हातातली
आपण माणसे
म्हणजे असतो
बाहुल्या
आणि
नेहमी घडत जातात मग
मनाविरुद्ध
अप्रिय गोष्टी;
या अप्रियतेशी सामना करण्याची
शक्ती
साठवलेली असते
फक्त
एका चित्त-शांतीत
'सुखदुःखे समे कृत्वा
लाभालाभौ जयाजयौ।'

—हीच ती स्थितप्रज्ञाची
जीवनभराची चित्तशांती
मागितलीस तू

कुंती
म्हणूनच
तू समर्पण करू शकलीस
समिधेप्रमाणे
शरीर
वनाग्नीला

एकट्या तूच
मागून घेतलेस
खरेखुरे सुख
चिरंतन सुख
दुःखनिःशेष
जीवनभराचे परमसुख.

## युधिष्ठिर ॥८॥

यम असतो अविचल
धर्म असतो प्रवाही
सततच बदलणारा
स्थल-कालसापेक्ष
परिवर्तनशील, गतिमान रथचक्र

या त्याच्या सतत बदलण्याच्या प्रक्रियेतच
सामावलेली असते
असह्य गतिशीलता
आणि
समर्थ गतानुगतिकताही

जनसामान्यांना असह्य होते
ही वेगवती गतिशीलता
आणि
गतानुगतिकता करीत असते

त्यांचे सामर्थ्य–हरण
सदाच

यमापासून होतो धर्म
यमसंभव धर्म
—यम असतो अविचल
धर्म असतो प्रवाही.

हे धर्मराज–
तू धर्मासारखाच वागलास.

द्यूताचे आव्हान स्वीकारण्याचा
राजधर्म सांभाळलास तू
पण केलास अधर्म
धर्मपत्नी पणाला लावण्याचा
दया हे धर्माचे मूळ
पण ते दुर्जनांचे ठरले वरदान
तर तो होतो अधर्मच

शांती हे एक धर्माचे रूप
पण अनाचाराला ती संरक्षक ठरली
तर तोही अधर्मच

'अहिंसा परमोधर्मः'
पण दुष्टांना पाठीशी घालून
उभी राहते जेव्हा ती

तेव्हा पदरी येते षंढत्व
आणि तोही ठरतो अधर्मच

सत्यापरता धर्म नाही
मग ते सत्य इतके निर्भेळ
इतके निखळ लागते—
जे पूर्ण सत्य नव्हे
आणि जे संपूर्ण असत्यही नव्हे
—असला मध्यम मार्गही
स्वीकारता येत नाही मग धर्माला
'नरो वा कुंजरो वा—'
आणि
धर्माचा सुवर्ण-रथ
उतरतो खाली
अन् उधळल्या धुळीने
मलिन होते
धर्मकांती.

साधुत्व ही धर्माची शोभा
पण तुझ्या क्षात्र-धर्माने
स्वीकारले जेव्हा साधुत्व............

म्हणूनच तू दिसलास—
केव्हा तरी पतित
केव्हा तरी षंढ

केव्हा तरी लाचार
केव्हा तरी ढोंगी
केव्हा कसा
केव्हा कसा

शूरता व क्रूरता
कृतज्ञता अन् लाचारी
दया आणि दुबळेपण
अभिमान आणि अहंकार
यांतला सूक्ष्म भेद शोधणे
कठिण असते
तसेच
धर्म आणि अधर्म
यांतल्या अतिसूक्ष्म सीमारेषा
शोधून काढणे तर
महाज्ञान्यांनाही
कठिणतर असते.

आजचा धर्म
असतो उद्याचा अधर्म
आणि आजचा अधर्म
केव्हातरी
सिंहासनारूढ असतो धर्म

हे युधिष्ठिर—

तू धर्म आचरिलास
आणि अधर्म्य अशा किती तरी गोष्टी
तुझ्या हातून घडल्या
पण अधर्माला धर्म समजण्याचा
तू कधी अट्टाहास केला नाहीस.
तर अधर्माचरणाचे संपूर्ण प्रायश्चित्त स्वीकारायला
तू विवेकपूर्ण शांतचित्ताने सामोरा झालास
हेच तुझे मोठेपण.
धर्म—अधर्म
अधर्म—धर्म
याबद्दलचा सुटतो विवेक
ज्ञात्यांचाही
आणि येते
एक महाग्लानी

तेव्हाच
युगसंभव धर्म-संस्थापक
येऊन उभा राहतो पाठीशी
आणि पुन:
सवस्व हरवून बसलेल्या
धर्मसत्याला करतो
सिंहासनारूढ
सार्वभौम सम्राटपद
समर्पून.

# दुर्योधन ॥१॥

सतत सतरा दिवस चाललेल्या
स्वजन-रक्तपाताने
चिंब भिजून गेलेली धरणी.

वीरांच्या वीर-गर्जनांनी
रणभेरींच्या आणि मरणांच्या आरोळ्यांनी
भरून गेलेले आकाश.
वर्षाऋतूतील कोसळणाऱ्या मेघसरींप्रमाणे
कोसळणारी
वीरा-महावीरांची
योद्ध्या-महायोद्ध्यांची
रथी-महारथींची
असंख्यात शिरे–शरीरे
कोसळत होती सतत
संतत धारेप्रमाणे
आणि

कुरुक्षेत्रावर आला होता
मरणाला महापूर.
आणि
हे कुरुनंदना
तरीही निःशंक निर्धाराने उभा होतास
तू त्या महापुराकडे
तुझे धीट डोळे लावून.

या मरण-पुराला
रजस्वला द्रौपदीच्या वाहत्या विटाळरक्ताचा
घन-गडद रंग
या वाहत्या रक्ताच्या गतिमान ओघात
तो पाहा–
वाहून चाललाय शकुनी
वाहून जातोहे दुःशासन
कर्ण–द्रोणाचार्य, भीष्म पितामह
सारे तुझे सखे, आप्त, मित्र
आणि वंदनीय गुरुजनही.

आणि तरीही निःशंक उभा होतास तू
एकटा
वाहून जाणाऱ्या साऱ्या स्वकीयांकडे
पाहात
महाकाय, मदोन्मत्त गजेंद्राप्रमाणे

हा वाहून जाणारा रक्त – विटाळ
— नव्हे
हे पापात्म्याचे विटाळले रक्त
वाहून जाणारे

हे सुयोधन —
राहून राहून एकच वाटते
— तू थांबायला हवे होतेस
— तू थांबायला हवे होतेस.

— तू थांबायला हवे होतेस —
द्यूत–क्रीडेत कपटाचा आश्रय करताना
— तू थांबायला हवे होतेस —
सतत तुझ्या बाजूने
दान देणाऱ्या फाशांनी
पांडवांची राजलक्ष्मी
तुझ्या स्वाधीन केल्यावर.
तू थांबायला हवे होतेस —
राजलक्ष्मी हरवून बसलेल्या पांडवांनी
गृहलक्ष्मीला पणाला लावल्यावर.

पण हे मदोन्मत्ता —
तू थांबला नाहीस

जिंकलेल्या पांडवांच्या गृहलक्ष्मीला

भर सभेत नागवी करून
स्वत:च्या रंगशाळेतील भोगदासी करण्यासाठी
धजावलास तू

लाक्षागृह योजनेपासून
द्रौपदी वस्त्रहरणापर्यंत
तू वाहावतच गेलास.
—थांबलाच नाहीस कधी

आणि अखेर
ऊरुभंगाने
आपल्या किरीट–कुंडलांसह
धुळीत पडल्यावरही
थांबला नाहीस.
अश्वत्थाम्याकडून वदवूनच घेतलीस
प्रतिज्ञा
पांडवकुलसंहाराची.

केवढा भीषण अविचार,
भयानक बंधु-द्वेष

हे राजाधिराजा —
क्षत्रियांना असावीच लागते
राज्यतृष्णा,
सत्ता-संपत्तीची अभिलाषा ;

प्रखर असावीच लागते
प्रतिकारशक्ती,
आणि वैऱ्यांचा नि:पात करणारी
आक्रमक वृत्तीही ;
पण—
नि:पात करायचा असतो
आक्रमक वैऱ्यांचा,
स्वजन बांधवांचा नव्हे
क्षत्रियांनी जिंकायची असतात राज्ये
पराक्रमाने
कपटी द्यूताने नव्हे
जिंकून घ्यायची असतात
दुष्ट-दुर्जन परकीयांची राज्ये
स्वकीयांची लुबाडायची नसतात
—कधीही.

काहीही मिळवणे
कसेही मिळवणे
मिळवले म्हणजे पावले
मिळल्याशी कारण........

हे राजतिलका
हा काही धर्म-विचार नव्हे
ही आहे अविवेकी पशुता.

वीर पुरुषांचे असीम पौरुषही
मर्यादांकित असते
—तेव्हाच गौरव होतो त्याचा
मर्यादा पुरुषोत्तम म्हणून.

मर्यादा हे
विश्वातील सर्वच शक्तींना लाभलेले
भूषणभूत आद्यतत्त्व;
ह्या मर्यादातत्त्वामुळेच
विश्वाचे उभे आहे विश्वपण.

हे कुरुकुलभूषणा—
संयम ही जीवनाची शोभा आहे;
विवेकसंपन्न बुद्धी
हे मानवाचे भूषण आहे.

हे सकलगुणमंडित कौरवा—
तू थोर होतास
पण अघोर झालास
तुझ्या क्रूरतेने
कुरूप करून टाकले
तुझ्या वीरतेला.
नाही........नाही
मर्यादांचे महत्त्व
तू कधी मानलेच नाहीस.

साध्य-सन्निध होताना
साधन-शुचितेचा एक महान विचार
तू सोडलास
आणि तुझी सारी साधना
दुर्गतीला गेली.
कपट-द्यूताने हरले नव्हते पांडव
हार झाली होती तुझ्या प्रामाणिकतेची
झाली नव्हती द्रौपदी विटंबित
तर तू केली होतीस
आपल्याच कुलसौभाग्याची विटंबना.
तसा तर धर्माच्याही हातून
घडला होता अधर्म
योगेश्वर श्रीकृष्णानेही केला होता
कपटाचा आश्रय.
पण आपाततः
अजाणता घडलेला अधर्म
अन् दुर्जन हननासाठी
साधूंच्या परित्राणासाठी
धर्मसत्याच्या उद्धरणासाठी
अपरिहार्यपणे
श्रीकृष्णाने केलेला कपटनीतीचा अवलंब
आणि
कारणावाचून तू आरंभिलेले कपट,
जाणून केलेला अधर्म

– ही एकाच तोलाने
मापता येत नाहीत कधीच राजन् !

तशी तर वेदकाळापासून
देव-दानवांची
दानव-मानवांची
आर्य-अनार्यांची
सततच होत आली होती
युद्धे-महायुद्धे या भूमीवर
पण....
स्वकीयांविरुद्ध स्वकीयांचे
हे भारतीय युद्ध
बंधु-बांधवांचेच असे हे महायुद्ध
तुझ्याच
अपरिमित, अघोरी राज्यतृष्णेने
घडवून आणले
भारताच्या या धर्मभूमीवर;
देवप्रिया अशा ह्या
ऋषीश्वरांच्या पुण्यभूमीवर.
भाऊबंदकीचा पहिला उद्गाता
ठरला आहेस तू.

गंगा-यमुनांच्या ह्या पवित्र देशात
स्वकुलनाशी विष-वाहिनीचे

उगमस्थान
हे अविवेकी अंधपुत्रा—
तू
तूच ठरला आहेस.

# द्वितीय पाण्डव भीम ॥ १० ॥

भीमरूपी महारुद्रा........
हे कुंतीनंदना—
तुझे जीवन म्हणजे
एक शक्तिस्तोत्र,
महातेजाची पूजा,
प्रमत्त वेगाला वंदन,
शुद्ध पौरुषाचा षोडशोपचार.

अहिंसा, सत्य, अस्तेय
सहिष्णुता, शांती
या सद्गुण सरितांचा जिथे होतो
संगम
त्या पवित्र
तीर्थाचे नाव
—धर्म.
अशा सद्गुणी धर्माला

सज्जनांचे संवर्धन साधले
तरी
दुष्टांचे निर्दालन
सहजसाध्य केव्हाही असत नाही.
धर्म
शूरतेचा सन्मान करतो
पण
क्रूरतेला कधी थारा देत नाही.
अन्यायाचा प्रतिकार मान्य असला
तरी
सूडबुद्धी हे लांच्छन मानले आहे
धर्माने,
कारण
प्रकृतीने परिवर्तनशील धर्म
दुर्जनांच्याही स्वभाव-परिवर्तनावर
ठेवतो विश्वास
त्यांच्या कृतिकाठिण्याला
पश्चात्तापाचे पाझर फुटण्याची
पाहतो वाट
आणि
दुष्टांना वाटते—
धर्म-दया हे दुर्बलतेने घेतलेले
पांघरूण आहे
कातडीवाचवू.

शांती
—हे तर धर्माचे ढोंग
सहिष्णुता—
हे भित्रेपण,
अस्तेय–अहिंसा....

आणि स्वैर होतात
दुष्टवृत्ती,
आपल्या
प्रबळ क्रूर कृतींनी
घालतात थैमान
आणि उठतो
हाहा:कार,

मग
सडले ते फेकावेच लागते
कुजले ते कापावेच लागते
म्हणून
प्रगटतात देवता
रौद्ररूप धारण करून.

कधी
कराल कालीच्या रूपाने
कधी
कृतांत काळभैरवाच्या रूपाने

कधी प्रगटतात
—नारसिंहाचे रूप धारण करून.

हा नसतो कुणाचा
सूड;
हे असते
सज्जनांचे प्रतिपालन
हे असते
धर्मसंस्थेचे रक्षण.

मानवातील माजलेल्या
अधार्मिक, हिंसक
असुर प्रवृत्ती
नामशेष करण्यासाठी.

तूही प्रगटला होतास
शक्तिरूपाने
धर्मरक्षणासाठी.

अशा काळशक्तीचा
प्रतिकार करणे
कधीच शक्य नसते
—कुणाला
कधीच शक्य नसते.

ही शक्ती

विषप्रयोगाने मृत होत नाही,
यमुनेच्या डोहात बुडवली तरी
मरत नाही,
पेटवल्या लाक्षागृहातही
जळत नाही,
‘ नैनं छिन्दन्ति शस्त्राणि
नैनं दहति पावकः ’

जी मरण्यासाठी नव्हे
तर जन्मलेली असते
मारण्यासाठी
मरणावर मात करणाऱ्या
या भीम शक्तीला
पूर्वपीठिका आहे
—उपजताच
सूर्यबिंब धरू धावणाऱ्या
बलशाली चिरंजीवाची.

वज्राची कठोरता
वायूचा वेग
दावाग्नीचा क्षोभ
या त्रिशक्तींचा संयोग
म्हणजेच
तू ;
पण

त्यांना हे काय माहीत ?
—म्हणूनच
ते रचीत राहिले
कारस्थाने
—तुझ्या नाशासाठी ;
विणीत राहिले
जाळी
जागजागी
पण
कोपऱ्या कोपऱ्यात माजवलेली
ही कोळिष्टके
घातक ठरतात ती
चिलटा धुंगुरट्यांना,

गरुड शक्तीला
त्याची काय तमा ?

हे बलवंता—
तुझा जन्म होता
उन्मत्त जरासंधाला
मांड्यांतून उभा फासटून
चिरण्यासाठी.
हे अमिताशना
जन्म होता तुझा
— नरमांस भक्षणाची चट लागलेल्या

खादाड बकासुराला
बुकलून
रक्त ओकीत
यमसदनाला पाठविण्यासाठी,

तुझा जन्म होता
मदांध झालेल्या
कामी कीचकाला
नरकाला धाडण्यासाठीं.

भर सभेत
सभ्यतेची सोडून मर्यादा
निर्लज्जपणे
उघडी मांडी करून
पतिव्रतेला हिणवणाऱ्या
सम्राट दुर्योधनाला
त्या मांडीचे
करून चूर्ण
किरीटकुंडलांसह
धुळीत मिळविण्यासाठी
झाला होता जन्म तुझा.

असहाय्य झालेल्या
रजस्वला–मुक्तकेशा
एकवस्त्रा द्रौपदीला

कचपाशाला धरून
फरफटत आणली
ज्याने
आंतरगृहातून
राजदरबारात
आणि
घातला हात
तिच्या निरीला
त्या
दुःशासनाची फोडून छाती
खदखदा हासत
त्या उसळत्या उष्ण रक्ताचे
घटाघटा पिऊन घोट
स्वतःची तृषा शमविण्यासाठी
आणि
त्याच रक्तभरल्या हाती
मुक्तकेशा द्रौपदीची
घालण्यासाठी वेणी
झाला होता
जन्म तुझा.

भीमरूपी महारुद्रा—
हे द्रौपदीपते—
तुझे जीवन

म्हणजे शक्तिस्तोत्र,
महातेजाची पूजा,
प्रमत्त वेगाला वंदन,
शुद्ध पौरुषाचा षोडशोपचार.

# अधिरथ सूतपुत्र कर्ण ॥ ११ ॥

जेव्हा केव्हातरी
या साऱ्या अनंत अवकाशात
होता नुसता प्रकाश
एक प्रचंड तेजोगोल
दिवसाला रात्र नव्हती
प्रकाशाला सावली नव्हती.

आणि एक दिवस
प्रचंड विस्फोटाने
हा तेजोगोल खण्ड-खण्ड होऊन
उधळला स्वतःच
आणि अवकाशात उधळलेल्या
त्या खण्ड-खण्ड तेजःकणांचीच
निर्माण झाली
एक ग्रहमाला.

पण तेव्हा सुद्धा

निर्माण झाला नाही
सूर्यापासून दुसरा सूर्य
सूर्यापोटी निपजली
दगडा–मातीने भरलेली
ही पृथ्वी
आणि निपजला शनीही
सूर्यापोटी
––पण निपजला नाही
सूर्यापोटी दुसरा सूर्य.

आप, तेज, वायू, आकाश....
या पंचतत्त्वांच्या संयोगातून
ही अनंत चैतन्य सृष्टी
साकारते
सूर्य हे एक तत्त्व
मग जर सूर्य
एकाच वेळी दोन झाले
तर
सृष्टीचा तोलच सुटला असता.

हे कर्ण—
तू सूर्यपुत्र होतास
पण तू सूर्य मात्र नव्हतास
कारण

तू सूर्यपुत्र होतास
तेव्हाच कुंतीपुत्रही होतास.

दैवी शक्तीचा
कोणत्याही मानवी जीवतत्त्वाशी
संयोग होतो तेव्हा
तो असतो अंशमात्र
आणि असे
संयोगसीमित, अंशमात्र ईश्वरीपण
म्हणजे नव्हे पूर्ण ईश्वरत्व.

प्रत्येक मानव,
मानवच नव्हे तर
वृक्षपाषाणापासून तो किडा-मुंगीपर्यंत
जड, चेतन अशी ही सर्वच सृष्टी
हा तिचा दृश्याविष्कार.
हा त्या एका महान चैतन्यशक्तीचाच विलास.
प्राणिमात्रात ईश्वर आहे
पण प्रत्येक प्राणी मात्र ईश्वर नव्हे.

हे सूर्यपुत्र—
तू तेजस्वी होतास
पण इतका तेजस्वी नव्हतास
की तुझ्या दीप्तीमुळे
उजळून निघावे

तुझ्या भोवतालचे सारे ग्रहमंडळ.

हे महारथी कर्णा
तू पराक्रमी जरूर होतास
पण इतका पराक्रमी नव्हतास
की या पृथ्वीसकट सारे ग्रहमंडळ,
तुझ्याच भोवती परिक्रमत राहावे.

रित्या मेघांनी
करावा गडगडाट
किंवा करावी
उथळ पाण्याने
खळखळ अधिक
तसा
वाचाळपणाने वाया गेलेला
तुझा पराक्रम
तसेच
तुझे दातृत्वही.

जे दान
दात्याला अहंकारी बनवीत नाही
आणि
याचकाला
बनवीत नाही लाचार
असे

ते काही
सर्वश्रेष्ठ समजले जाणारे
गुप्तदान नव्हते
नगारे पिटून
फिरवली जात होती
ज्याची द्वाही
अशा —
उघड्यावर प्रदर्शन मांडलेल्या
या दातृत्वाकडे
आकर्षित झाली होती
फक्त
— बुभुक्षितांची रांग;
व्रणातील
कुजके मांस
आणि
मृतासाठी सिद्ध करून
उघड्यावर ठेवलेला पिंड
यांच्यावर
एकजुटीने तुटून पडणाऱ्या
काक पक्ष्यांच्या झुंडीप्रमाणे.

योग्य दाता
सुयोग्य याचक
असा समसमा संयोग

कधी घडलाच नाही
आणि मग
सतत घडत राहिले
तुझ्या हातून
निव्वळ अपात्री दान.

अपात्री दान
नकळत करीत असते
आळशी ऐद्याचे उदरभरण
अनाचारी अचरटांचे
पापी पोषण.

हे दान
ना दात्याला
कृतकृत्यतेचा केवलानंद देऊ शकले
वा
याचकाला
तृप्तीचे सुख देऊन
खरेखुरे सन्मानित करून
त्याच्या जीवनाचे
उन्नयन साधू शकले.

काळ्या कातळावर
पेरावे बीज

तसे
तुझे दातृत्व गेले वाया.
अवध्य
होतास
ज्या कवचकुंडलांमुळे
तीही केलीस तू
अवेळी
अपात्री दान
त्यातून घडला
फक्त मित्रद्रोह
आणि
उगवले —
तुझे पराभूत मरण.

सद्गुणांना
पिढ्यानुपिढ्यांचे सातत्य राहते तर....
हे जग
सुखाचे नंदनवन झाले असते
थोर पित्यापोटी जन्म होणे
हे असते
आपले भाग्य,
तो काही असत नाही
आपला पराक्रम.

म्हणूनच मी म्हणतो —
तू सूर्यपुत्र होतास
पण नव्हतास सूर्य
नव्हतास सूर्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००८२ वि: काव्य
क्रमांक २९८८ नों दि: २/३/९१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २००८२
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

# शकुनी ॥१२॥

हे शकुनी
—हे अपशकुनी
तुझ्या नावामागे जोडल्यावाचून
हा उपसर्ग
पूर्ण सार्थ होत नाही
तुझे नाव.
तुझा हा उपसर्ग
साऱ्या कुरुकुलाला भोवला
आणि
या उपसर्गाला सार्थ केलेस तू;
हा उपसर्ग हीच तुझी पदवी
हाच तुझा सन्मान
गौरव
मिरविण्यायोग्य बिरुद
अ–प–श–कु–नी.

दुर्जनांचीही असते एक तपःसाधना
आणि त्यांनाही प्राप्त होते
दिपवून टाकणारे
विस्मित करून टाकणारे
एखादे सामर्थ्य.

दिन–प्रकाश विस्तारत असताना
अंधारभरल्या झाडाच्या ढोलीत
प्रहरानुप्रहर डोळे मिटून बसणाऱ्या
घुबडाला
किंवा भर उन्हात
डोळे मिटून
उलटे टांगून घेऊन झाडावर
स्वतःच स्वतःची विष्ठा खात
अघोरी तप आचरणाऱ्या
वटवाघुळाला
लाभते एक दिव्य दृष्टी
ज्या दिव्य दृष्टीला दिसते
गडद अंधारात दडून गेलेले
नेमके आपले भक्ष्य.

हे शकुनी —
तूही केली होतीस अशीच एक तपस्या
आणि
फलद्रूप होऊन लाभली होती तुलाही

एक दिव्य दृष्टी.
त्या दृष्टिसामर्थ्यामुळेच
हेरून काढला होतास तू
जळून गेलेल्या जरासंधाच्या
जळक्या हाडातही
धगधगत असलेला
पांडवविद्वेष

हे खरे वैर
हे खरे-खुरे-हाडवैर,
त्याच वैरी हाडांचे करून फासे
जिंकून घेतलेस पांडवांना
जय झाला होता क्षात्रधर्मी कौरवांचा
युद्धात नव्हे—
द्यूतात.

ह्या द्यूत विजयाची जय-ध्वजा
—नव्हे, एक पेटती चूड
एक धगधगती मशाल
हे—गांधारी-सहोदरा
तू कुरुकुलात
राजमंदिरापासून शय्यागृहापर्यंत
आपल्या स्कंधावरून
दिमाखाने नाचवलीस
आणि दिलास

कुलस्वास्थ्याला,
समाधानाला
भडाग्नी.

हे अघोरकर्मन् शकुनी'—
द्यूत विजयासाठी
स्मशानातील अमंगळ हाडे
आणलीस तू
राजगृहात
आणि
एकदा सन्मानित करून आणलेल्या
त्या अमंगळ अस्थींनी
साऱ्या कुरुकुलाला
साऱ्या रथी-महारथींना
आपल्या
अठरा अक्षौहिणी सैन्यासकट
रक्त-मांसरहित करून
उरवली त्यांची नुसती हाडे.

महायुद्धाच्या महातांडवात
नामशेष झालेले सारे रक्त-मांस
काही गेले होते जळून.
काही कुजून
मुरून;
काही —

कोल्ह्या–कुत्र्यांची
घारी–गिधाडांची
पोटे तट्ट करून
सरून गेले
आणि उरली—

इतस्ततः विखुरलेली
हाडे, हाडे आणि हाडे.

बघावे तिकडे साचलेले
हाडांचे ढीग.
जागोजाग रचलेल्या
हाडांच्या राशी
स्मशानवत् झालेल्या
राजनगरीत
सर्वत्र पखरण
—हाडांचीच.

हस्तिनापूर
—नव्हे अस्थिनापूर
—एक महान अस्थिनगर.

या भीषण नरमेधात
हे अघोर–तापसी शकुनी—
अग्निसंस्काराने
रक्त–मांसरहित झालेल्या

कित्येक सहस्रकांच्या
कोटिकोटी मानुषकांच्या
ह्या अस्थींच्या महागारात
आता मिसळून गेल्या आहेत
तुझ्याही अस्थी.

मग
हे दीर्घद्वेषी शकुनी—
देह–दहनानंतरही
अवशिष्ट राहिलेल्या
जरासंधाच्या हाडात
धगधगत राहिलेल्या
पांडव–विद्वेषाप्रमाणे
तुझ्याही अस्थींनी
अजून जतन करून ठेवला असेल
सज्जनांचा
सभ्यतेचा
सुष्टतेचा
—म्हणजेच पांडवांचा द्वेष
—दीर्घ द्वेष
महाभयंकर पांडव-विद्वेष ?

# द्रोणाचार्य ॥ १३ ॥

मिसळते जेव्हा हलाहल
अमृतात
तेव्हा
साहजिकच गमावून बसते हलाहल
आपली संहारक शक्ती.

दुःख त्याचे नसते
—पण या विषसंयोगात
अमृत हरवून बसते
आपली
अजरामर करणारी
संजीवक शक्ती
—दुःख असते त्याचे

कुमार अश्वत्थामा
दुधासाठी हट्टाला आला

आणि
पिठवणी पाजून
तुझ्या पत्नीला करावे लागले
समाधान त्याचे

बाल अश्वत्थामा फसला
आणि पिठवणीलाच दूध समजून
शांत झाला

पण तू—
तू अस्वस्थ झालास
—कमालीचा अस्वस्थ झालास
संसारातल्या
या भयकारी
भीषण दारिद्र्याचे
दर्शन होताच
तू मात्र चवताळून उठलास
आणि
सारी लाज-लज्जा सोडून
राजैश्वर्य उपभोगीत असलेल्या
आपल्या गुरुबंधूकडे
धावलास,
द्रुपदाच्या दारी
याचक होऊन उभा राहिलास

ऐश्वर्याच्या द्वारी
अठरा विश्वे दारिद्र्य
उभे राहिले होते जाऊन
तुझ्या रूपाने

संपन्न लक्ष्मीच्या दारी
विपन्न उभी राहिली होती
सरस्वती
आणि मग —
मग व्हायचे तेच झाले
— अनादर, अपमान, हेटाळणी ....
आणि रित्या हाती
परत फिरावे लागले तुला

तू संतापलास
भडकलास
शेवटी भरकटलास
प्रतिज्ञाच करून बसलास
— प्रतिशोध घेण्याची.

—इथेच सुटला तुझा धर्म
विवेक इथेच संपला
खरे तर तूच
प्रथमतः दंडक मोडलास.
—विद्याविभूषित, व्युत्पन्न

सरस्वतीपुत्रांच्या द्वारी
संपन्न लक्ष्मीपुत्रांनी
विनम्रभावे यावे
आणि नतमस्तक होऊन
आशीर्वाद-पुनीत व्हावे
आपला करभार देऊन
—ही होती रीत
हीच रीत होती.

तुझा तोल सुटला
—दारिद्र्यामुळे
आणि होऊ नये ते झाले
—ते एक झाले

पण
शांत चित्ताने विचार न करता
तू क्रोधाविष्ट झालास
आणि
विद्यासंपन्न, विवेकी
ब्राह्मणाच्या अंतरात
असू नये
ते विष
—असूया—
अशा विषाला
तू कायमचा थारा दिलास

सूडाच्या प्रतिज्ञेने
आपल्या अंतरात

सर्पसुद्धा
आपले जन्मदत्त गरळ
मुखात ठेवतो—मर्यादित
त्याला थारा देत नाही कधी
अंतरात

दारिद्रय—
दारिद्रयामुळे याचकत्व
याचकत्वातून अपमान
अपमानामुळे क्रोध
क्रोधातून सूडाची प्रतिज्ञा
मग प्रतिज्ञापूर्तीसाठी सहेतुक विद्यादान
आणि सहेतुक विद्यादानातून
स्वाभाविक विकसित झालेला
आप-पर भाव
आणि या आप-पर भावनेतून
तुझ्या शिष्यांच्यांत
अजाणता
पण तूच उदित केलेला
वैरभाव.
कौरव—पांडवांना तू विद्या-दान केलेस
—हे कसले विद्यादान ?

हा तर सरळ सरळ विद्याविक्रय होता.
कौरव–पांडवांना
तू विद्या दिलीस
पण....
जागृत केलास वैरभावही त्यांच्यांत
या आप-पर भावनेने
विद्याग्रहण समयी.
कुमार–वयात
कौरव–पांडवांत पडलेली
ही वैरभावाची ठिणगी
पुढे कैक काळ
धुमसत राहिली नुसती
आणि एक दिवस
त्यातून भडकून उठली
महायुद्धाची आग

हे द्रोणाचार्य—
तू गुरू होतास
पण सद्‌गुरू नव्हतास,
तू ज्ञानी होतास
पण आत्मज्ञानी नव्हतास,
तू ब्राह्मण होतास
पण ब्रह्मज्ञानी नव्हतास,
—तू ब्रह्मज्ञानी नसतास

तर व्यक्तिगत
सांसारिक दु:खदर्शनाने
तू असा
भेदरून, बावरून गेला नसतास
—तू आत्मज्ञानी असतास
तर व्यक्तिगत अपमानासाठी
सूड—संतापाच्या आधीन
कधीही झाला नसतास

दारिद्र्याला भिऊन
ऐहिक सुखाला लालचावलेले
तुझे मन
आत्मनिर्भरता गमावून बसले.
आणि
सूडसंपादनासाठी
दूषित झालेले तुझे विद्यादान
तुझे सद्गुरुपद नासवून बसले
या तुझ्या नासल्या सद्गुरुपदाची
साक्ष
तो पाहा—
तो एकलव्य
आपला अंगुष्ठरहित
रक्तभरला हात उंचावून
देत आहे

तू अर्जुनाशी
—म्हणूनच पांडवांशी सख्य केलेस
आपल्या व्यक्तिगत सूड–शमनासाठी
आणि
तुच्छ लेखलेस तेव्हा
दुर्योधन-दुःशासनादि कौरवांना

पण मग सांसारिक सुख-स्वास्थ्यासाठी
उघड्या डोळ्यांनी
पाहात राहावे लागले तुला
पांडवांवरील निर्घृण अन्याय
असहाय्य अबला द्रौपदीची
भरसभेत मांडलेली विटंबना
कर्ण-दुर्योधनांनी केलेले अपमान
सहन करीत राहावे लागले
स्वाभिमानशून्य होऊन
आयुष्यभर

—आणि अखेर
मिठाचे मिंधेपण,
अर्थाचे दास्य
म्हणून
उघड-उघड अनर्थकारी
अन्याय्य पक्ष स्वीकारून
उभा राहिलास रणात

आपल्या लाडक्या शिष्यांसमोर
—अर्जुनासमोर
पांडवांसमोर
लाचारी, मिंधेपण, सुखलोलुपता
याच ठरल्या तुझ्या जीवनकक्षा
याच जीवनकक्षा.

केवळ चारा-पाण्याच्या सुरक्षिततेपायी
धनसंपन्नांच्या
सत्ता-संपन्नांच्या गोठणीवर
आपली विद्या, प्रज्ञा, धर्म
यांसह
दावणीला बांधून घेणारा
पहिला
पराधीन अपराधी,
हे महाब्राह्मणा—
—तू आहेस

तू आहेस
हे द्रोणाचार्य
तू थोर होतास
वंदनीय होतास
—तसे तर कागविष्ठेचे पिंपळही
वंदनीय असतात—
पण

देव-मंदिराच्या कळसावर उगवून
आपली मुळे ते पसरू लागतात
तेव्हा
मुळासकट उपटून काढावे लागतात त्यांना
आणि
श्रीकृष्ण-प्रेरणेने
तुझ्या प्रिय शिष्यांना
करावे लागले ते

——तेच करावे लागले
तुझ्या मृत्यूने तू नाहीसा झालास
पण तो विखार
....ते विष
सूड, असूया, लाचारी
नाही निघून गेली
तुझ्याबरोबर
तर——
तुझ्या रक्तबीजातून निर्माण झालेल्या
अश्वत्थाम्याच्या रूपाने
मस्तक-मणी हरवून बसलेली
तेजोहीन लाचारी
पसाभर तेलासाठी
दारोदार हिंडवणारी भिक्षांदेही
चिरंजीव होऊन गेली.

# अश्वत्थामा ॥१४॥

हे द्रोणपुत्र—
जे जे होते भव्य दिव्य,
होते महन्मंगल,
तेजस्वी, ओजस्वी—
ते ते सारे संपून गेले
—त्या महाभीषण भारतीय युद्धात
आणि ह्या
मरण–मारणाच्या महापसाऱ्यातून
मानवांच्या
पुढल्या सहस्रोसहस्र पिढ्यांसाठी
चिरंजीव असा उरलास
—फक्त तू
आपल्या जखमा वेदनांसह;
मणी हरवलेले तेजोहीन मस्तक,
सतत चिघळत जाणारी
सतत वाहात राहणारी

ओली जखम,
यज्ञोपवीताची तुटकी धर्मखूण
वेदनापूर्ण जीवन घेऊन
भीक मागत फिरतो
दारोदार
पसाभर तेलाची
— एक चिरंजीव
चिरंजीव अश्वत्थामा

अश्वत्थाम्या —
तू आहेस चिरंजीव
पण
फक्त तूच राहिला आहेस का
चिरंजीव ?
नाही .... नाही
एवढेच नाही

हे चिरंजीव अश्वत्थाम्या —
तू या जगात
ज्याला ज्याला केलास स्पर्श
किंवा
जे जे स्पर्शून गेले तुला
त्याला त्याला दिलेस तू
चिरंजीवित्व
या मर्त्य मानवांच्या जगात

तू दिले आहेस
वेदनेला अमरत्व
सतत चिघळत जाणाऱ्या जखमेला
तू दिले आहेस
सातत्य.

तुझ्यामुळे
क्षुद्र तृष्णेला मिळाले आहे
अखंडत्व.
मस्तकमणी हरवलेल्या तेजोहीन लाचारीला
लाभले आहे अढळपद
या भूतलावर
ईर्षा, असूया आणि सूड
यांनाही लाभले आहे नित्यत्व.

सारेच संपून जाणाऱ्या ह्या मर्त्यलोकी
——सारे संपेलही कदाचित
पण....
पण वेदना, जखमा, लाचारी, तृष्णा
ईर्षा, सूड, असूया
हे सारे कधीच नाहीसे होणार नाही
ह्या अवनितलावरून
——कधीच नाहीसे होणार नाही
कारण

तू आहेस चिरंजीव
हे अश्वत्थाम्या —
तू आहेस चिरंजीव.

# विदुर ॥१५॥

हे विदुर—
तू ज्ञानी
महान धर्मज्ञ
नीति-तत्त्ववेत्ता
तुझी वाणी निनादत राहिली आहे
साऱ्या महाभारतभर
एखाद्या पवित्र शिवमंदिरातील
घंटानादाप्रमाणे

साऱ्यांनी केले तुला वंदन
तुझी अमृत—वाणी केली श्रवण
साऱ्यांनी महात्मा महात्मा म्हणून
गौरविले तुला
—पण महाज्ञानी
नीतिवान महात्म्यांचे
जे करीत आला नेहमीच

समाज
तेच
अगदी तेच झाले तुझे
जे झाले तुझ्या पूर्वी
जे झाले समक्ष तुझ्या
जे होत आले तुझ्यानंतर
जे होत आहे
आजही

महात्म्यांच्या मूर्ती बनविल्या जातात
देव्हाऱ्यातून पूजिल्या जातात
उभारण्यात येतात मंदिरे त्यांची
त्यांची वाणी केली जाते ग्रथित
आणि पाठांतराने होत राहतो
वेळी–अवेळी तिचा उद्‌घोष
—संस्कृतीची शोभा म्हणून.

सन्मानासाठी का संत
सांगत असतात सत्य ?
समाजाने पूजापात्र ठरवावे
म्हणून का धडपडत असतात
महात्मे—आयुष्यभर ?
त्यांच्या धर्मज्ञतेचा
द्रष्टया दिव्यदृष्टीचा
अवघ्यांनी केला आहे

एवढाच उपयोग
आजवर;
एवढाच उपयोग केला आहे.

तसे तर
सत्ता–संपन्नांचा मूर्खपणाही
शहाणपणा म्हणून लादला जातो
ज्यांच्यावर
आणि
जे लादून घेतात तो निमूटपणाने
चेहऱ्यावर लाचारीचे हसू फुलवून,
तेच
तेच आखून देत आले आहेत
सत्ताविहीन शहाणपणाला
महात्म्यांच्या बोलांना
व्यवहारवादाच्या लक्ष्मणरेषा.

'महात्म्यांची पावले वंदनीय असतात
ती या लक्ष्मणरेषेच्या मर्यादेबाहेर'
असेच ते सांगत असतात.
महात्म्यांच्या वर्तनातून प्रकटणारी
माणुसकी,
चरित्र-चारित्र्यातून सतत प्रकटत राहणारी
महन्मंगल विवेकी धर्मशीलता
ती असून सहज-सुलभ आचरणीय

लोक त्याची करतात गणना
अलौकिकात
रचली जातात मग त्याची
लीळा चरित्रे
त्यांच्या स्वाभाविक मानवी कृतींवर
ही माणसे
व्यवहाराच्या धगधगत्या अग्नीत
तापवलेले
ठसे उठवतात
देवत्वाचे;
ते कळवळतात
रडतात
पण त्यांचे रडणेही
भक्तिगीत म्हणून ऐकले जाते
मोठ्या तल्लीनतेने

जे होऊ नये म्हणून
तुम्ही महात्मे जपता
टाहो फोडून सांगत राहता
आयुष्यभर
तेच होत राहते

जनहितासाठी
जन-जागरणासाठी
तुम्ही खर्ची घातलेले तुमचे आयुष्य

ही व्यवहारदक्ष, हिशेबी माणसे
आपल्या जमाखर्चाच्या चोपडीत
खर्ची टाकतात
धर्मादाय म्हणून
आणि आपल्या जमेकडे लिहितात
फक्त
श्री शिल्लक शून्य तुमच्या नावे
आणि एक कोरेच पान सोडले जाते
खातेवहीत.

तुमच्या पुण्यप्रतापाने
डळमळू लागते जेव्हा
त्यांचे व्यवहारी सिंहासन
तेव्हा हा
जनता--जनार्दन
तुमच्या मस्तकावर रुतवतो
आपला पाय
आणि गाडून टाकतो तुम्हाला
सप्तपाताळाखाली

हे व्यासपुत्र विदुर---
तू सांगत आलास
शिकवीत राहिलास
पण---
' महात्म्यांची वाणी श्रवणीय असली

कृती आदरणीय असली
तरी आचरणीय नसते '
—हेच जगाने शिकविले तुला.

## द्रौपदी ॥ १६ ॥

स्त्री—
स्त्री आहे पृथ्वीतत्त्व
धारणकर्ती धात्री
पोषण करणारी माता
जीवनदात्री धरा
हीच ती
नानारत्ना वसुंधरा

पायदळी तुडवली जाणारी,
प्रत्येक प्राणिमात्राचे पदाघात
निर्वैर सहन करत राहणारी
जीवनवरदायिनी
मातामयी ही
जिच्या सोशिकतेला अंत नाही
जिच्या दातृत्वाला सीमा नाही
जी कणभर घेते

आणि मणभर देते
एक बीज घेते
आणि
फलभाराने लदून निघणारा महावृक्ष करते
तुमच्या स्वाधीन;
म्हणूनच आम्ही तिला म्हणतो—
अम्बा
जगदम्बा

ही सोसते
सारे सहन करीत राहते
ही सोसते अन्यायांचे आघात
अरेरावांनी केलेली पायमल्ली सोसते
युगानुयुगे

आणि मग जेव्हा होते
क्रोधाविष्ट ही
तेव्हा ........

तेव्हा अनावर असतो क्रोध हिचा.
हरितवसनावगुंठनात
शांत शांत दिसणाऱ्या
अपमानामुळे खदखदत राहिलेल्या
या भूमीच्या उदरातील
लाव्हा रसाचे प्रचंड लोट

प्रस्फोटाच्या उद्रेकाने
करकर कराल नाद करीत
आपला पर्वत—पाषाणांचा
विशाल जबडा विस्तारून
ओकू लागते जेव्हा ही
तेव्हा वणवे पेटतात
वने, उपवने जळून जातात
नगरे, महानगरे भस्मसात होतात
आणि उरतात फक्त
ढिगारे राखुंड्यांचे.

ही धरणी
आपल्या एखाद्याच कंपनाने
डोळ्याची पापणी लवण्याच्या अवकाशात
तोडून, मोडून
छिन्नविच्छिन्न करून टाकते
रचून ठेवलेला
मानवाचा जीवन संसार

अशी ही संहारिणी
स्त्री
—संतप्त झालेली
क्रोधाविष्ट झालेली स्त्री
अनावर असते
अनिरुद्ध असते

स्त्रीचा राग
म्हणजे असिलतेची धार
विद्युल्लतेची दीप्ती
रसरसत्या ज्वालामुखीचा उद्रेक;
ती नसते अबला
तिच्या एका अश्रूत साठविलेली असते
खवळत्या सप्त सिंधूंची
पृथ्वीला पालाण घालणारी शक्ती.

हिने फोडलेला आर्त टाहो ऐकून
कानाचे पडदे फुटतात,
स्वर्ग-कवाडे खडाखड उघडतात.

ही शिवशक्ती
चित्त प्रक्षोभित झाली
तर
साऱ्या अमंगलाचा नाश तर
ती करतेच
पण शिवही शवरूप करून टाकते
ही विक्राल कराल काली.

मग रक्तावाचून शमतच नाही
तिची तहान
भागत नाही मग भूक तिची
नरमांस भक्षणावाचून.

जिचे अलंकार मग होतात
रुंडमाला,
जिचे वस्त्र असते
नरदेहावरल्या सोलल्या कातडीचे,

स्त्री—
ही सोसते
ही सहन करते
जन्मोजन्मी, पिढ्यानुपिढ्या
सोशीत राहते;
मागे
तारामती होऊन सोसल्या हिने
सर्व हाल अपेष्टा
दैन्य, दारिद्र्य, वनवास;
अहिल्या होऊन भोगले
अकारण
शापित पाषाण-आयुष्यही

पण
स्त्रीच्या सोशिकतेची परिसीमा झाली
ती मात्र सीतेच्या आयुष्यात
अग्निपरीक्षेने
शील-शुद्ध म्हणून स्वीकारलेली जानकी
पुन: लोकपाल रघुवीराने
त्यागिली तिला

पण ती बोलली नाही
कधी बोललीच नाही
जळत राहिली मनात
मुकेपणाने जळत राहिली
आयुष्यभर
आणि मुकेपणाने
मनातली जळती आग
तशीच घेऊन
जिथून आली तिथे
निमूट निघून गेली
ही भूमिकन्या

आणि एक दिवस—
धगधगत्या अग्निकुंडातून बाहेर आली
एक दीप्तिमान, दिव्य स्त्री-काया.
एक लवलवती अग्निशिखा
जळत राहणे
जाळत राहणे
हाच जिचा देह-धर्म
आपल्या पंचप्राणांचा—
पति-पांडवांचा सूड-संताप
सतत प्रज्वलित करीत राहिली
ही अग्निकन्या
आणि स्वतःही जळत राहिली

आयुष्यभर

अग्नीच्या विविध स्वरूपांतून
सतत प्रगटत राहिली संसारात
ही याज्ञसेनी.
केंव्हा स्नेहपूर्ण ज्योतीसम उजळली
केंव्हा स्नेहशून्य, धूर ओकत्या
ज्योतीवरल्या फुणगीसारखी
विझू–विझू दिसली
केंव्हा निखाऱ्यासारखी धगधगली
केंव्हा फुलून उठली
धडधडत्या ज्वालांनी;
केंव्हा कोसळली
कडाडत्या विद्युल्लतेप्रमाणे
केंव्हा झाली प्रस्फोटित
सर्व संहारक
भीषण ज्वालामुखीप्रमाणे

हे चित्तप्रक्षोभिनी—
कुणी तुला द्रौपदी म्हटले
कुणी याज्ञसेनी
कुणी पांचाली
कुणी कृष्णा.

पण

पुरुषी जुलुमापुढे
पिढ्यान्‌पिढ्या नतनम्र होऊन
हाल, अपेष्टा, दैन्य, वनवास
मार, प्रहार
सारे अन्याय
अपमान
निःशब्द सहन करून
मुकेपणाने
जळल्या मनाने निघून गेलेली
तू होतीस—
जानकी
तारामती
अहिल्या

तारामती, अहिल्या, सीता–
या इतिहासाला ज्ञात असलेल्या स्त्रिया
पण
इतिहासपटावर
ज्यांची उमटली नाहीत प्रतिबिंबे
अशा कित्येक
अज्ञात कुमारिका, सौभाग्यमंगला
माता नि परित्यक्ता
ज्या मुकेपणाने सोशीत आल्या
जुलुम जबरदस्तीचे पुरुषी अन्याय

आयुष्यभर

अग्नीच्या विविध स्वरूपांतून
सतत प्रगटत राहिली संसारात
ही याज्ञसेनी.
केव्हा स्नेहपूर्ण ज्योतीसम उजळली
केव्हा स्नेहशून्य, धूर ओकत्या
ज्योतीवरल्या फुणगीसारखी
विझू–विझू दिसली
केव्हा निखाऱ्यासारखी धगधगली
केव्हा फुलून उठली
धडधडत्या ज्वालांनी;
केव्हा कोसळली
कडाडत्या विद्युल्लतेप्रमाणे
केव्हा झाली प्रस्फोटित
सर्व संहारक
भीषण ज्वालामुखीप्रमाणे

हे चित्तप्रक्षोभिनी—
कुणी तुला द्रौपदी म्हटले
कुणी याज्ञसेनी
कुणी पांचाली
कुणी कृष्णा.

पण

पुरुषी जुलुमापुढे
पिढ्यान्‌पिढ्या नतनम्र होऊन
हाल, अपेष्टा, दैन्य, वनवास
मार, प्रहार
सारे अन्याय
अपमान
निःशब्द सहन करून
मुकेपणाने
जळल्या मनाने निघून गेलेली
तू होतीस—
जानकी
तारामती
अहिल्या

तारामती, अहिल्या, सीता–
या इतिहासाला ज्ञात असलेल्या स्त्रिया
पण
इतिहासपटावर
ज्यांची उमटली नाहीत प्रतिबिंबे
अशा कित्येक
अज्ञात कुमारिका, सौभाग्यमंगला
माता नि परित्यक्ता
ज्या मुकेपणाने सोशीत आल्या
जुलुम जबरदस्तीचे पुरुषी अन्याय

युगानुयुगे
वनगुहांतून
ग्राम—नगरांतून
राजप्रासादांतून
घराघरांतून
झोपडीझोपडीतून;
प्रपीडित झालेल्या
अखिल स्त्री-जातीवर
पिढ्यान्‌पिढ्या लादल्या गेलेल्या
अन्यायाचा
बदला घ्यायला आलेली
—तू होतीस अग्निकन्या

झाल्या गेल्या
स्त्री जातीवरील
अन्यायाच्या मोबदल्यात
तू करायला लावलेस
साऱ्या पुरुषजातीला
पेटल्या रणयज्ञात
एक अग्निदिव्य.

पेटल्या चंदन—चितेतून
पूर्वी सुरक्षित राहिली होती जानकी
उद्धरून गेली होती शिळा अहिल्या

पण द्रौपदी—
या रणयज्ञाच्या भडकत्या अग्निदिव्यातून
कोणीच सुटला नाही सुरक्षित
कोणीच सुटला नाही

सहस्रपाद, सहस्रशिर
सहस्राक्ष असा महाकाय
मदोन्मत्त झालेला
पुरुषी अहंकार
पूर्ण जळून गेला या रणयज्ञात
—जळून भस्मसात झाला.

# एकलव्य

॥१७॥

सूर्यदर्शनासाठी
कधी पेटवावे लागत नसतात दीप
जे असते स्वयंभू
त्याला लागत नसते परंपरा
नाही लागत त्याला
संस्कारांचे अवडंबर
लागत नसते निष्कारण
संस्कृतीचे अवडंबर.
—तर संस्कार, संस्कृतीचे
आणि असते
स्वयंसिद्ध उगमस्थान
जे परंपरेचेही

हे एकलव्य
तुला नव्हती परंपरा
नव्हती शिष्टमान्य संस्कृती तुला

——पण तुझ्याकडे होता
दुर्दम्य उत्साह
प्रबळ इच्छाशक्ती
निर्मळ भक्ती
आणि होती उदंड श्रद्धा.

विद्येवरील निःसीम भक्ती
आणि गुरू द्रोणांच्या विषयी
असीम श्रद्धा घेऊन
धाव घेतली होतीस तू
पण ——
सूतपुत्र कर्णाला विद्यादान करताना
जराही खळखळ न करणारी
ही ज्ञानगंगा
केवळ किरातपुत्र म्हणून तुला
अवगाहनाला अपात्र ठरवते
आणि
आटून कोरडी ठणठणीत होते
जागीच

हे विद्या-प्रेमळा——
खरे तर तुला झाला होता
थोडा उशीर
आचार्य झाले होते वचनबद्ध
अर्जुनाशी

त्यांनी सांगितले होते
प्रतिज्ञापूर्वक
धनंजयाला—
‘ हे मध्यमा
असणार नाही यापुढे
अवनितलावर ह्या
श्रेष्ठ धनुर्धर तुझ्याहून ’

हे वचन
ही होती एक वल्गना
प्राप्त झाल्या अधिकाराचा
अतिक्रम होता हा
अधिक्षेप होता सृष्टिक्रमाचा
नेहमीच
अनाकलनीय असलेल्या
अज्ञात भविष्याचा
एका मर्त्य मानवाने केलेला
उघड उघड अवमान होता हा

अनाकलनीयता भविष्याची
मानवी द्रोणाचार्यांसाठी
असली मान्य
तरी
वर्तमानाचा विसर पडावा....
कारण—

चिरंजीवपद प्राप्त झालेले
श्रीभगवान परशुराम
तेव्हा होते
पुढेही राहणार होते
पितामह भीष्मही होते हयात तेव्हा

खरे तर तुला पाहताच
पटला होता त्यांना
आपल्या प्रतिज्ञेचा फोलपणा
कारण
तुझ्या डोळ्यांत दिसली होती
त्यांना
ती ओसंडून वाहात असलेली
उदंड श्रद्धा
दुर्दम्य इच्छाशक्तीचे
झळाळते तेज
पटली होती खात्री मनोमन
—रत्न हे अस्सल
लखलखून उठेल
पडताच पैलू
—स्वतेजाने

हे आहे कोठार
ज्वालाग्राही वस्तूंचे
फक्त स्पर्श हवा ठिणगीचा

सूर्य हा साक्षात;
याचा विस्तारत गेला
प्रकाश
तर —
तर मग काजवे ठरतील सारेच.

म्हणून
आपल्या फोल शब्दांचे
वैफल्य नाकारण्यासाठी
घालवून देण्यावाचून तुला
या अविवेकी आचार्याला
उरला नाही मग
वेगळा मार्ग

द्वारी आलेल्या तुला
लावले धुडकावून
— तरीही मनी
खेद ना खंत तुझ्या
ना राग कोणाचा
— कारण
पूर्ण भरून गेले होते
तुझे मन
फक्त श्रद्धा – भक्तीने

जरी दिसले

आयुधसज्ज शरीर
वीरवराचे
तरी
श्रद्धा-भक्तीने युक्त असणारे
मन
आपले
आंतरिक नाते मात्र
जोडीत असते
संतांशी

राग, द्वेष, सूड, असूया
स्पर्धा वा ईर्ष्या
यांचा
मागमूसही नसतो तिथे

हे मन जाणते
—फक्त प्रेम करणे
केवळ प्रेम करणे

विश्वातील अणुरेणूंवर
वृक्षवेलींवर
गुरूवर, विद्येवर
आपल्या आयुधांवर
मृगयेवर
आणि

लक्ष्यवेध ठरणाऱ्या
मृग-संघावरही

हे प्रेमच
भक्ती करायला शिकवते
आणि
भक्तीचेच रूपांतर होते
गाढ श्रद्धेत.

जो करत नाही प्रेम
त्याला कळत नसते भक्ती
आणि
जो करत नाही भक्ती
त्याला श्रद्धेची शक्ती
पेलवत नाही

तुला विद्यावंचित ठेवू इच्छिणारा
कुरुकुलाचे दास्य पत्करलेला
तो एक सामान्य मानव होता.
श्रद्धेची फुले वाहून
कृतार्थ व्हावे
आणि
धूपदाणीतील धुपाप्रमाणे
जळून जावे ज्याच्यासाठी
अशी नव्हती ही

सद्‌गुरुमूर्ती

खुडलेल्या कळीला
फुलवावे लागते फुंकरून
पण
जीवनरस पिता पिता वाढणारी
वेलीवरची कळी
सहज
स्वाभाविकच उमलते
दुर्दमनीय उत्साहाने

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 20002 दि. 8/5/05
क्रमांक 2968 नों दि. 2/3/99
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. 20002
संद. शाखा (स्थळ प्रत)

उठलास तू
मूठभर माती
ओंजळभर पाणी
मिसळलीस
एकजागी
आणि
अंतरीची आर्तता एकवटून
कर्तबगार हातांनी
आपल्या,
आकाराला आणलीस
एक आचार्य मूर्ती

माती-पाण्याच्या संयोगात
उगवून येत नाही

असे बीज
अजून या जगाला
माहीत नाही.

तू घडवलेल्या
या मूर्तीतही
स्वाभाविकच
उगवून आले
निखळ सद्‌गुरुपण जगाचे
उजळले उधळले तेज
सूर्यकोटिसमप्रभेचे

त्याच गुरुमूर्तीच्या चरणावर
ठेविलेस मस्तक
आणि त्या मृत्तिकामूर्तीचा हात
उंचावला हर्षभराने
आशीर्वादासाठी
तरळले आनंदाश्रू नयनांत
आणि
अभिषेक-षिक्त-शिर
झालास तू

इतका निरपेक्ष आशीर्वाद
लाभला नव्हता कर्णाला
नव्हता अर्जुनाला

नव्हता भीष्मांना
आणि
लाभला नव्हता
स्वतः द्रोणाचार्यांनाही.

सर्वांनी हेवा करावा
असे हे परम भाग्य
लाभले होते
एकलव्या, केवळ तुलाच.

त्यांचीच प्रतिमा होती
ज्यांनी नाकारले होते तुला
विद्यादान

नाही,
ही गुरुमूर्ती नव्हती
द्रोणाचार्य म्हणविणाऱ्या
मानवाची.
ही होती मूर्ती
—वंदनीय पूजनीय अशा
परात्पर सद्‌गुरूची.
अनंत कोटी ब्रह्मांडनायक
परब्रह्मस्वरूप
जगद्‌गुरूची

हिला नव्हती बांधीलकी

कुण्या अर्जुनाला दिल्या
स्वार्थांध वचनाची
नव्हते बद्ध
चरण हिचे
दासपणाच्या शृंखलांनी

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः
गुरुर्देवो महेश्वरः
गुरुः साक्षात् परब्रह्म
तस्मै श्रीगुरवे नमः

त्या पूर्ण मुक्त
परब्रह्म स्वरूपाचे
वंदून चरण
चढवलास जो
एकदा
धनुष्यावर बाण
—मग ताणून तुटल्या
सहस्र सहस्र प्रत्यंचा
शतावधी धनुकमानी
मोडून गेल्या
—पण तू शिणला नाहीस
थांबला नाहीस
आणि
सारा धनुर्वेद आत्मसात केलास

हां हां म्हणता.

श्रद्धा—
जी दुरितांना देते प्रकाश
दलितांना देते शक्ती
पतितांना नेते उद्धरून
पांगळ्याच्या पायांना देते सामर्थ्य
गिरिपर्वत उल्लंघण्याचे
मुक्या मातीलाही करते बोलकी
गुरू–उपदेशासाठी.

श्रद्धा—
पण तिला नसते दृष्टी
ती असते जन्मांध
जन्मांध आहे प्रेम
म्हणूनच ते धूर्त नसते
जन्मांध आहे भक्ती
म्हणूनच लोकरहित असते ती
आणि
जन्मांधच आहे श्रद्धा
म्हणूनच....

हे किरातपुत्र—
केवढी जिद्द
केवढी ईर्षा बाळगून

तू केलीस विद्यासाधना

होय
ही ही एक ईर्षाच होती
स्वतःची स्वतःबरोबर मांडलेली.

इतकी निकोप ईर्षा
जागवली नाही
कोणत्याच छात्राने आजवर.

दुसऱ्याचा पाहून उत्कर्ष
मत्सरग्रस्त मनात उदित होते
जी ईर्षा,
ती असते हीनतर;

——जी बाळगली ईर्षा
कर्णाने अर्जुनाविषयी आपल्या मनात
जी भीमाने नेहमीच बाळगली
कौरवांच्या द्वेषात
–अशीच बाळगली होती सर्वांनी ईर्षा
राग द्वेष मत्सरापायी
आपापल्या मनात
आणि त्यातूनच घडला मग
एक महाभीषण संहार.
लोभ-प्रलोभनरहित सत्त्वस्थ साधना
केलीस फक्त तू

कुणी शस्त्रविद्येची साधना केली
राज्यतृष्णेसाठी
कुणी केली अस्त्रविद्या आत्मसात
जगताला भयचकित करून
अंकित करण्यासाठी.

कोणी करत आले होते ज्ञानसाधना
स्वतःच्या जनमान्य पूजा पात्रतेसाठी.
—तुझी साधना होती
धवलगिरीच्या उदरातून
स्वाभाविक उगम पावलेल्या
पवित्र गंगोदकासारखी

इथे कुणाला
नीच करण्याची नव्हती इच्छा
नव्हती महत्त्वाकांक्षा
कुणाचे हीनपण पाहण्याची
इथे नव्हती राज्यतृष्णा
अधिकारलालसा नव्हती इथे
आकांक्षा नव्हती स्वामित्वाची
इथे होती फक्त
स्वतःला उंच करण्याची
निर्मळ मनीषा

ही साधना होती

‘ ख ’ला स्वाहाकारून
सर्वात्म ईश्वर प्राप्तीसाठी
योगियांनी अंगिकारलेली
योगसमाधी.

खुलून गेलास मग तू
या समाधिसुखाने
—पूर्णतः फुलून गेलास

मकरंदसेवनासाठी
आसुसलेल्या मधुपांना
कमलिनी उमलल्याची गंधवार्ता
पोहोचवावी जशी पवनाने
तितक्याच स्वाभाविकपणे
मग घडत गेल्या पुढल्या सर्व गोष्टी.

पूर्ण एकांतात चाललेली तुझी साधना
अचानक एक दिवस
आली प्रत्ययाला अर्जुनाच्या
आणि
आले धावून स्वतः द्रोणाचार्य
तुझ्या दारी.

थिटे पडले गगन तुझ्या आनंदाला
वाटले तुला—
पाहून आपली पारंगतता

गुरुहृदयाला येईल भरते
फिरेल पाठीवरून हात
स्नेहार्द्र आशीर्वादाचा
सांडतील मस्तकी आनंदाश्रू
— पण
कडाडल्या विजेप्रमाणे शब्द उमटले
— 'हवी आहे गुरुदक्षिणा मला'

'—मनसा चिन्तितं एकम् ।
दैवमन्यत्र चिन्तयेत् ॥—'

आणि ....
आणि मग
युद्धावाचूनच एक अवयव तुटून
विद्ध झाला परमवीर
समरावाचून सांडली गेली
एक उष्ण रक्तधारा
ताणल्यावाचून प्रत्यंचा
मिळवला धुळीत
एका श्रेष्ठ ज्येष्ठ धनुर्धराने
— एक उगवता तेजस्वी धनुर्धर

घडले होते हे अवयवदान
गुरुदक्षिणेपायी
सांडले होते हे रक्त

गुरुपादप्रक्षालनासाठी

सत्कर्माचीही असते एक धुंदी
ती विचारशून्य करते माणसाला

तू घडवलेल्या गुरुमूर्तीच्या
आणि
तुझ्या समोर येऊन उभ्या राहिलेल्या
मानवी मूर्तीतल्या
बाह्यात्कारी रूप-साधर्म्याने फसलास तू
आणि
मागितली दक्षिणा देऊन तृप्त केलास
तू एक सामान्य माणूस
—ज्याचे चरण होते
कुरुकुलाच्या सुवर्ण शृंखलांनी
सजवलेले
आणि
ज्याचा वचनबद्ध हात अडकला होता
शेजारी उभ्या असलेल्या अर्जुनाच्या
हातात
पण ती—
तुझ्या हाती
तूच
शिलास्थलावर स्थापलेली ती सद्गुरुमूर्ती
—ती मात्र

गुदमरली होती
तुझा हा आततायी अविचार पाहून
तो तुझा खराखुरा सद्गुरू
तो मातीचा पुतळा
तुझ्या ह्या कृतीने
अखेर
तडे जाऊन तडतडला
खळखळ भंगून गेला
आणि
मिसळून गेला मातीत
तुझ्या आयुष्यासारखाच

हे किरात पुत्र--
श्रद्धेला पंख असतात गरुडाचे
पण
लाभलेली नसते तिला
गरुडाची भेदक दृष्टी
--ज्या गरुड दृष्टीला
नेमके हेरता येते गगनसंचरणात
निमग्न असतानाही
धुळीत सरपटणारे विषारी जिवाणू

श्रद्धेला आपल्या पंखबळावर
उंच
उंच

अति उंच जाता येते
अडथळा नसलेल्या अवकाशात
आनंदाने विहरता येते
पण दगडधोंड्यांनी
खाचाखळग्यांनी भरलेल्या
भूपृष्ठावरून चालणे मात्र
अशक्य असते तिला

हे अरण्यपुत्र —
श्रद्धेला नसता अंधत्वाचा शाप
—तर ही शोकांतिका झालीच नसती.
ही शोकांतिका होतीच ना.

## भगवान श्रीकृष्ण ॥१८॥

कंव्हा तरी एकदा द्वारकेत
करण्यात आली होती
तुझी सुवर्णतुला
आणि
त्या सुवर्णनगरीतील
साऱ्या सुवर्ण राशी सरून गेल्या
तरी जड राहिले होते
तुझे पारडे

वस्तुतः
साक्षात हिरण्यगर्भाची
जड सुवर्णाशी तुलना होणार कशी ?

हे श्रीकृष्णा —
हे भगवान श्रीकृष्णा —
तू देव होतास
की मानव होतास ?

तुझ्या समग्र चरित्रासिंधूत
अवगाहन केल्यानंतर
या दोन्ही प्रश्नांची उत्तरे
अस्तिपक्षीच मिळतात
आणि मग
मनापुढे आणखी दोन प्रतिप्रश्न उभे ठाकतात
—तुझ्यातील देवत्व मोठे
की तुझ्यातील मानव्य मोठे ?

या दोन्ही प्रतिप्रश्नांची उत्तरे मात्र....

मग मी माझ्या मनाच्या
अतिसूक्ष्म तराजूत
विवेक बुद्धीचा समतोल काटा लावून
आरंभिली तुझी तुला

या तुलनेसाठी
मी प्रथमतः
साऱ्या देवांचे देवत्व
एका पारड्यात टाकले
आणि एका पारड्यात बसवले तुला
पण छे !
अखेर
तुझे पारडेच जड राहिले

मग मी साऱ्या मानवांचे मानव्य

एकत्र केले
आणि घातले दुसऱ्या पारड्यात
पण तरीही....

मग मी
साऱ्या देवांचे देवत्व
आणि
अखिल मानवांचे मानव्य
एकत्र केले
आणि घातले एकाच पारड्यात
पण तरीही
जडच राहिले तुझे पारडे

श्रीकृष्णाची तुलना
फक्त एका श्रीकृष्णाशीच
होऊ शकते.

पण मग
अशा एकमेव श्रीकृष्णाला
तुलायचे तरी कसे?
तुलना म्हटली की दुसरे काही हवेच.

आणि मग
अतुलनीय अशा
श्रीकृष्णाला तुलण्यासाठी
मी त्या श्रीकृष्णालाच विभागून टाकले

आणि एका पारड्यात घातले श्रीकृष्णाचे
मानवीपण
आणि दुसऱ्या पारड्यात घातले
त्याचे दैवीपण

आणि काय आश्चर्य !
श्रीकृष्णाचे दैवीपण
अधांतरी उचलले जाऊन
ते पारडे स्वर्गगामी झाले
आणि
भूमिस्पर्शित राहिले
त्याच्यातील मानवीपणाचे पारडे

तुझ्यातील देवत्वाहून मोठे आहे
तुझे मानवीपण
तुझ्या मानवी कृतींच्या पुढे
थिटे वाटू लागतात
तुझे दैवी चमत्कार.

कोणतीही गोष्ट मापण्यासाठी
आधी एक परिमाण लागते
हे श्रीकृष्णा ——
तू म्हणजेच
आम्हा भारतीयांना सापडलेले

महामानव मापण्याचे
एक निश्चित परिमाण आहेस.

भगवन्
तू म्हणजे जीवन संगीताचा षड्ज आहेस
समग्र भारतीय संगीतात
त्यातील साऱ्या राग-रागिणींत
तू सर्वत्र मिसळून गेला आहेस.
कधी कोणत्या रागात
कुठे पंचम वर्ज्य होतो
कुठे निषाद नाकारला जातो
कुठे रिषभ
कुठे मध्यम
—- पण
असा एकही राग अगर रागिणी नाही
की जिथे कधी
नाकारण्यात येतो षड्जच.

षड्ज हा जसा आदि-स्वर आहे
तसा अंत्य-स्वरही तोच आहे.
पण षड्ज हा
जरी सर्व संगीताचा

अधिष्ठाता स्वर असला
तरीही तो एक
सर्व समावेशक, सर्व समर्पित
असा स्वर आहे
असा हा एकच एक स्वर आहे.

षड्जामुळे सर्वच स्वर सिद्ध होतात
आणि मग
या साऱ्या स्वरांच्या स्वरूपसिद्धतेमुळेच
साऱ्या राग-रागिण्या
आकारास येतात.

नुसत्या षड्जामुळे
एकही राग
अगर रागिणी
सिद्ध होऊ शकत नाही
आणि
तुझा समर्पित जीवनग्रंथ
हेच सांगतो आहे--
भगवन्
तू म्हणजे
भारतीय जीवन संगीताचा षड्ज आहेस.

तू
सर्वांच्यासाठी सर्व केलेस
कर्तव्याच्या जाणिवेने
कर्तेपणाचा अहंकार पुसून
--कर्मण्येवाधिकारस्ते
मा फलेषु कदाचन ॥--

कर्तव्य करून
कर्तेपणाचा अहंकार पुसून
ईश्वरशरणता पत्करणे
हाच तुझा जीवन संदेश.

ही ईश्वरशरणता
आज आम्ही सतत
तुझ्याच नावाने उद्घोषित करत असतो

मंगल, अमंगल
इष्ट – अनिष्ट
धर्म्य – अधर्म्य
--यांतला सूक्ष्म भेद
निश्चित करू न शकणारे आम्ही
आमच्या अल्प बुद्धीला

स्वल्प मनाला पटलेले
कोणतेही कर्म
नि:शंकपणे करतो
आणि
समर्पित करतो तुलाच --
श्रीकृष्णार्पणमस्तु ।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २००९२ दि: ७/१/२०४
क्रमांक २१८८ नों: दि. २३।११
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २००९२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0020092

स्वल्प मनाला पटलेले
कोणतेही कर्म
नि:शंकपणे करतो
आणि
समर्पित करतो तुलाच ––
श्रीकृष्णार्पणमस्तु ।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २००८२ दि:
क्रमांक २१८८ नों: दि: २३।११

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0020092
REFBK-0020092

'जीवन-व्यास' ही कै० मधु भोसले यांची निर्व्याज-मनोहर कृती आहे आणि ती त्यांच्या अकालमृत्यूच्या काळ्या पार्श्वभूमीवरच प्रगट व्हावी ही एक नियतीची विचित्र करणी आहे. महाभारत म्हणजेच नियतीच्या सूत्राची विस्मित करणारी जाणीव आहे, आणि त्या नियतीच्या सूत्राची पुरेपूर जाणीव मधु भोसले यांना होती हे या कृतीत सतत दिसून येते. परंतु हा लेखक मृत्यूच्या बंधनात इतका लवकर अडकला जाईल याची कल्पना वाचकाला मात्र सहज पचवता येण्यासारखी नाही. सारखे वाटत राहते की जीवन-व्यास सारखी अतिशय हृद्य आणि विचारगर्भ निर्मिती आणखी निरनिराळ्या आविष्कारांत विपुल, सूक्ष्म आणि भव्य रूपे घेऊन यापुढे सतत आमच्यात राहायला हवी होती. जीवन-व्यास ही त्या भावी कृतीची नांदी असायला हवी होती, पण जीवनाची नांदी म्हणून सूत्रधार स्वतः कायमचा अंतर्धान झाला आहे आणि पुढचे नाटक अनुच्चारित राहून गेले आहे असे सतत वाटत राहते.

या 'जीवन-व्यासात' अठरा कविता आहेत आणि त्यात महाभारतातल्या विविध व्यक्तींशी कवीने संवाद केला आहे. भगवान व्यास, भगवान श्रीकृष्ण, युधिष्ठिरादि पाण्डव, कुंती, द्रौपदी, गांधारी इत्यादि व्यक्तींशी केलेले हे संवाद वाचकाला बरेचसे काही नवीन सांगून जातात. हे काव्य वाचताना कुणीही रंगून जाईल आणि क्षणभर तरी थांबून विचार करील यात संशय नाही.

किंमत दहा रुपये

(म ४०१)